# माणूस माणूस माणूस माणूस माणू

बुधवार,
९ डिसेंबर १९७०
चाळीस पैसे

## स्वतंत्र तेलंगण राज्याची मागणी मान्य करण्यात आली तर ?

सिद्दीपेठ
निकाल

या चळवळीचे
पहिल्या दिवसापासूनचे

सिद्दीपेठ
निकाल

एक शिल्पकार
श्री. प्रताप किशोर

सिद्दीपेठ
निकाल

यांना
मी प्रश्न केला.

## तर मग तेलंगण राजकीय नरकपुरी होईल

बुधवार, ९ डिसेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : वेचाळीसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

### जनसंघ, भगवाध्वज, कोयता-हातोडा वगैरे...

□ आपल्या ताज्या अंकातील 'हिंदूसमाजवादी' यांचा 'भगव्याध्वजावर कोयता हातोडा' हा लेख आणि त्यावरील आपले संपादकीय वाचण्यात आले. जनसंघाच्या आजच्या राजनीतीवर या दोन्ही लेखांनी योग्य तो प्रकाश पडला आहे.

भारतातील बहुसंख्य प्रजा ही हिंदूच असल्याने येथील सर्वच पक्ष हे तसं पाहिलं तर हिंदूंचेच पक्ष आहेत. येथील सर्वच राजकीय व सामाजिक चळवळी या एका अर्थानं हिंदूंच्याच चळवळी आहेत. नक्षलवादी चळवळ--मार्क्सिस्ट, लेनिनिस्ट, कम्युनिस्ट पक्षाने संघटित केलेली सशस्त्र क्रांतीची चळवळ ही देखील हिंदूंचीच चळवळ आहे. येथील भूमीमुक्ती आंदोलन अथवा कामगारांचा बोनस लढा ही आंदोलने हिंदूंचीच नाहीत काय? भूमीमुक्ती आंदोलनाच्या परिणामातून ज्या भूमीहीनांना जमीन मिळण्याची शक्यता निर्माण होईल, ते भूमीहीन बहुसंख्य हिंदूच असतील. बोनस लढ्यातून जादा बोनसची आर्थिक प्राप्ती गरीब हिंदूनाही होतेच ना? त्यामुळे येथील राज्यशासन आणि सर्व राजकीय चळवळी या येथील बहुसंख्य जनतेच्या म्हणजेच हिंदूंच्याच नेतृत्वाखाली, प्रभावाखाली असून त्या आपापल्या राजकीय

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

मतप्रणालीद्वारे परंतु प्रामाणिकपणे येथील सर्व हिंदी जनतेच्या सुखासाठी प्रयत्न करीत आहेत.

असे जर आहे तर हिंदूंच्या एखाद्या वेगळ्या पक्षाची खरोखर काही आवश्यकता आहे काय? दुरभिमान बाजूला ठेवून थोडे शांतपणे आपण जर जगाच्या इतिहासाकडे पाहिले तर असे दिसून येते की, मानवाला आदर्शभूत ठरतील अशा व्यक्ती आणि मानवतेला काळीमा फासणाऱ्या व्यक्ती सर्वच देशांच्या आणि सर्व संस्कृतीमधून जन्माला आल्या आहेत. भगवान श्रीकृष्ण आणि कंस, कौरव आणि पांडव, वाली आणि सुग्रीव, छत्रपती शिवाजीमहाराज आणि सूर्याजी पिसाळ यासारख्या सुष्ट आणि दुष्ट, बऱ्या आणि वाईट व्यक्ती एकाच भारतीय संस्कृतीनं जन्माला घातल्या ना? हजारो वर्षे विशिष्ट समाजाला अस्पृश्य ठरवून त्यांना मानवी हक्काला वंचित करणारी आपलीच संस्कृती ना? मध्ययुगात वैभवशाली कालखंड अनेक देशांच्या इतिहासात कमी अधिक प्रमाणात येऊन गेलेच आहेत. मग आपण, आपला देश आणि आपली संस्कृती हीच सर्व जगात सर्वश्रेष्ठ अशी दुरभिमानाची भूमिका घेण्यात आणि पसरविण्यात काय अर्थ आहे?

त्याचा अर्थ असा आहे की, स्वतःचा देश आणि धर्म याबद्दल जे प्रेम जनतेच्या मनात उपजतच असते त्याचा गैर फायदा घेऊन, सामान्य जनतेला मध्ययुगीन संस्कृतिनिष्ठ आणि धर्मवादी चळवळीत ओढणे आणि तिला पुरोगामी, विज्ञाननिष्ठ आणि समाजवादी चळवळीपासून फोडणे होय. जनसंघ हा संस्कृतिनिष्ठेची, धर्मवादाची आणि प्रखर राष्ट्रवादाची मनोहारी तोरणे बांधलेला परंतु बहुजन समाजाच्या दृष्टीने फसवा सापळा आहे. जैसे थे वादाचा पुरस्कार करण्यासाठी आणि क्रांतिकारी बदलाला विरोध करण्यासाठीच जनसंघाचा जन्म झालेला आहे. सामाजिक आणि धार्मिक चौकटीत ज्यांना मानाचे स्थान आहे, चातुर्वर्ण्याचो चौकट कायम राहिल्याने ज्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचत नाही अशांचा तो पक्ष आहेच. पण आता राजे महाराजे, जमीनदार, जहागिरदार, भांडवलदार आणि कारखानदार हेही जनसंघाच्या झेंड्याखाली जमू लागले आहेत. त्यामुळे 'हितसंबंधी' लोकांचा रक्षणकर्ता पक्ष असे अधिकाधिक स्वरूप त्याला येत जाणार आहे आणि हे जसजसे होत जाईल तसतसे सामान्य जनता आणि जनसंघ हे एकमेकापासून अधिकाधिक दूर जातील.

**५ डिसेंबर, १९७०** **श्रीविलास कुलकर्णी, पुण**

# कंटाळवाणी नाटके

उत्तर प्रदेशातील राजकारणातले नाट्य कधी संपत नाही. पण पुन्हा पुन्हा तोच तो प्रयोग पाहिल्यावर तो कितीही नाट्यमय असला तरी कंटाळवाणा ठरतो. तसेच सध्या उत्तर प्रदेशचे झाले आहे. उत्तर प्रदेश विधानसभेतील भारतीय क्रांतिदलाच्या नऊ आमदारांनी नुकताच पक्ष त्याग केला आणि तेथील राज्यकर्त्या संयुक्त विधायक दलाच्या एकीला चांगलाच हादरा बसविला.

हे नवे संयुक्त विधायक दल म्हणजे पाच पक्षांची बांधलेली मोट. जुन्या काँग्रेसचे नेते टी. एन्. सिंग यांच्या नेतृत्वाखाली या दलाने त्या राज्यात मंत्रिमंडळ स्थापून पुरे दोन महिनेही अद्याप उलटले नाहीत. एवढ्यातच या नव्या मंत्रिमंडळाला ऑक्सिजनवर टाकावे लागते की काय असा प्रसंग निर्माण झाला आहे. कारण दलातील प्रमुख पक्ष भा. क्रां. द. या नऊ आमदारांच्या पक्षत्यागाने भाक्रांदची संख्या ७६ वर आली आहे. आणि हे नऊ जण म्हणताहेत, जरा थांबा; विधानसभेचे अधिवेशन सुरू होईपर्यंत आमची संख्या ३५ च्या वर जाणार आहे!

नव्या काँग्रेसला आणखी काय हवे? उत्तर प्रदेशातील या सं. वि. द. मंत्रिमंडळाला सुरुंग लावायला नवी काँग्रेस अगदी उतावीळ आहे. किंबहुना या नऊ आमदारांचा पक्षत्याग नवी काँग्रेसच्या नेत्यांच्या पवित्र्यांचाच परिणाम आहे अशीही काहींना दाट शंका आहे. उत्तर प्रदेश हाती आला की दिल्ली मुठीत आल्यासारखी होते म्हणून ही गडबड.

उत्तर प्रदेशात श्री. सिंग यांच्या नेतृत्वाखाली नवे सं. वि. द. मंत्रिमंडळ स्थापन झाले होते त्यावेळी एकदम वेगळीच हवा निर्माण झाली होती. याच प्रकारची सं. वि. द. मंत्रिमंडळे इतर काही राज्यात आणि लवकरच दिल्लीतही स्थापू असा असा अविर्भाव जुन्या काँग्रेसने आणला होता. आणि त्या जोरावर अल्ल ऽऽऽ हुर्रर्र ऽऽऽ करीत जुन्या काँग्रेसचे जुने नेते साऱ्या देशभर दौरे काढीत होते. हेतू हा की नव्या काँग्रेसच्या उरात धडकी भरावी. अर्थात काही दिवसातच या नेत्यांचा भ्रमनिरास झाला. उत्तर प्रदेशातील पक्षत्यागाचे हे प्रकरण बघून आता त्यांच्याच उरात धडकी बसली असणार.

या नाटकातले पुढचे अंक कसे असतील हे काय सांगायला हवे? नव्या काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याच्या बाबतीत जरी या नऊ आमदारांनी अद्याप तोंड उघडले नसले तरी लवकरच ते बोलू लागतील. एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. या नऊ जणांचा पक्षत्याग जाहीर होण्याच्या तब्बल तीन दिवस आधी नव्या काँग्रेसचे चिटणीस शंकर दयाल शर्मा यांनी हे भाकीत वर्तविले होते!

उत्तर प्रदेशात घडत असलेल्या या घटनांच्या पार्श्वभूमीवर पंजाबातील अकाली दलाच्या तिन्ही गटांची नुकतीच झालेली एकी एकदम उठून दिसते. अकाली दल जातीय पक्ष म्हणून त्या दृष्टीने ही एकी जरी फारशी स्पृहणीय नसली तरी त्यामुळे पंजाबच्या राजकारणाला सबळ स्थैर्य आले आहे. प्रकाशसिंग बादल यांचे मुख्य-मंत्रिपदाचे आसन पक्के झाले आहे.

हे तीन गट म्हणजे संत फत्तेसिंग, गुरुनाम सिंग आणि ग्यानसिंग रारेवाला यांचे. फत्तेसिंग गटाच्या बादल सरकारला जनसंघाचा पाठिंबा होता. पण जन-संघाचे काहीतरी बिनसले आणि त्या पक्षाने आपला पाठिंबा काढून घेतला. तेव्हा-पासून बादलांना आपले सरकार नव्या काँग्रेसच्या मर्जीवर टिकवून ठेवावे लागत होते आणि कोणत्याही सरकारला नवी काँग्रेस उगाचच पाठिंबा थोडीच देते. त्या पक्षाला किमत हवी होती संयुक्त सरकारची. अकाली दलाने नव्या काँग्रेसमध्ये विसर्जित व्हावे अशीही एक सूचना होती.

पण अकाली दलाच्या तिन्ही गटांच्या अचानक झालेल्या या एकीने नव्या काँग्रे-सची स्वप्ने पार विरली. पंजाबात आता काही काळपर्यंत तरी त्या पक्षाला बॅक-ग्राउंडवरच रहावे लागेल. पंजाब विधानसभेत आता अकाली दलाचे संपूर्ण बहुमत निर्माण झाले आहे.

परंतु हेही लक्षात घेतले पाहिजे की अकाली दलाचे अनेकवार तुकडे झाले आहेत आणि पुन्हा ते एकत्र झाले आहेत. त्यामुळे यावेळची एकी किती पक्की आहे हे ती किती काळपर्यंत टिकते यावरूनच कळून येईल. या संदर्भात एक गोष्ट महत्त्वाची आहे. मुख्यमंत्री बादल यांची नव्या काँग्रेसशी युती करण्याची तीव्र इच्छा होती. यासंबंधी बोलणी करण्यात तेच पुढाकार घेत होते. सध्याची एकी त्यांच्या फारशा आवडीची नव्हती.

जुन्या काँग्रेसचा बालेकिल्ला गुजरात. पण या राज्यात जरी त्या पक्षाचे सरकार असले तरी पक्षाची एकी फारशी बलवान नाही. अधून मधून पक्षात सतत झगडे होत असतात. जुन्या काँग्रेसचे राष्ट्रीय धोरण या झगड्यांना कारणीभूत असते. राष्ट्रीय पातळीवर जनसंघ आणि स्वतंत्र पक्षाशी युती करण्याची पक्षाच्या नेत्यांची भाषा गुजरातनेच थांबविली.

आता गुजरातचे अर्थमंत्री जसवंत मेहता यांनी राष्ट्रीय जुन्या काँग्रेसपासून फुटून निघण्याची सूचना मांडली आहे. इतर पक्षांशी युती करण्यापेक्षा नव्या काँग्रे-सशी एकी करणे काय वाईट असा त्यांचा सवाल आहे. श्री. मेहता यांचा हा पवित्रा जुन्या काँग्रेस नेत्यांच्या इतर पक्षांशी युती करण्याच्या हालचाली कायमच्या बंद पाडील असे दिसते.

□ □ □

# पालेकर

# एक भला सहसंपादक

आता जवळजवळ अस्तंगत झालेल्या जुन्या जमान्यातल्या वृत्तपत्रांच्या सहसंपादकांच्या भाळी नियतीने एक क्रूर शाप कोरला होता: चंदनासारखं झिजण्याच्या ऐवजी, ते खडूसारखं झिजतील! आणि खरोखरीच ते तसे झिजले देखील. त्यांनी खूपच सोसलं. तापत्रय काढले. वणवण केली. भाषणबाज पुढाऱ्यांनीही त्यांना खूप सोसायला लावलं. तांगडवलं. न पेलणारा क्रॉस त्यांना बळेच उचलायला लावला. बरं, स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीचा तो काळही असा मंतरलेला होता की दुय्यम, तिय्यम श्रेणीच्या सहसंपादकांची समाजाची नसती देणी आपल्या गळ्यात सुखेनैव अडकवून घेतली. मिरवले गेले पुढारी आणि मिरवून घेतलं वरिष्ठ संपादकांनी, की ज्यांच्या उपरण्यावर पांडित्याचं गुलाबपाणी शिंपडलेलं होतं. बिचारे गरीबगुरीब सहसंपादक मात्र त्या उंच माणसांच्या सावलीला भिजलेल्या पाखरासारखे गप्प गप्प बसून राहिले. एकंदरीने त्यांनी निव्वळ कातळ फोडला. कष्ट उपसले. आपदा भोगल्या. शिवाय जोडीला आपल्या अनिच्छ कुटुंबियांनासुद्धा आपल्या ओढगस्तीत सामील व्हायला लावलं. आज सहसंपादक कायद्याची

सांस्कृतिक मुंबई

रवींद्र पिंगे

भाषा बोलतात. त्याकाळी सहसंपादक देशभक्तीची वगैरे सालस भाषा बोलत. वृत्तपत्रव्यवसाय हे लोकजागृतीचं व्रत मानण्याचा तो काळ आणि मोका होता. जे अष्टावधानी होते, ते चतुर पुरुष वेळीच पुढारीपण करू लागले. वृत्तपत्रव्यवसायातला दैनंदिन धाबडधिंगा टाळून, पत्रकर्तृत्वाची सोईस्कार शाल तेवढी ते खांद्यावर टाकू लागले. त्यांचा वृत्तपत्रव्यवसाय त्यांच्यापुरता मधुर झाला. पण असे थोडे. बहुसंख्य सहसंपादक भरडले गेले. पगार आहे-आहे, नाही-नाही अशा टांगळलेल्या अवस्थेत त्यांची जिंदगी खतम् झाली. लेखणीचं जुजबी हुन्नर, झटपट पुढे येण्याची घाई, चातुर्याचा अभाव, पांडित्याचा आव आणि दुसऱ्यांना दुरुस्त करणं हेच आपलं एकमेव अवतारकृत्य होय अशी उदंड श्रद्धा इतक्या गोष्टी ज्यांच्यापाशी एकत्र येत, ते बिनचूक सहसंपादक होत. पण तिथे सर्वांची पोटं भरली नाहीत. म्हणून काही-जणांनी जोडधंदा म्हणून रात्रीच्या शाळांमधून मास्तरकी केली; तुरुंगाच्या वाऱ्या केल्या; सूत कातलं. राष्ट्रीय साहित्य विकलं; पौष्टिक चरित्रं लिहिली; जानवी-जोड विकले. कै. का. म. ताह्मनकरांनी तर उतार वयातल्या प्रपंचाला हातभार लागावा म्हणून अक्षरशः वाती वळून किराणामालाच्या दुकानदारांना गिरगावात विकल्या! त्याला खडूसारखं झिजणं न म्हणावं तर काय म्हणात? पंधरवडया-पूर्वी मुंबईत अचानकपणे आणि खूपसे एकाकीपणे निधन पावलेले दैनिक "नव-शक्ती"चे माजी संपादक श्रीकांत पालेकर हे त्याच पिढीचे प्रतिनिधी होते.

शिरोड्याच्या सुरूच्या बनातलं मोकळ वारं प्यालेल्या तरुण पालेकरांचं त्या-काळच्या तारुण्यात व्हायचं तेच झालं. म्हणजे, रॅलीब्रदर्समध्ये चांगली कानाला बोरू लावून पंख्याखाली वारा घेत बसण्याची नोकरी होती, तिला रामराम ठोकून ते "सोलापूर डे"चा सत्याग्रह करायला बोरीबंदरासमोरच्या कापाच्या मैदानात शड्डू ठोकून उभे राहिले. पं. मालवीय एकमेव अग्रणी होते. सेनापती होते. पालेकर अनेक सैनिकांपैकी केवळ एक सैनिक होते. हत्यारबंद पोलिसांचे पाठीत दांडे खाऊन सगळे अहिंसक सैनिक तुरुंगात गेले. पालेकरही विसापूरच्या तुरुंगात डांबले गेले. तिथे संगत चांगली लाभली. रंगराव दिवाकरांनी त्या घोर बंदिवासात पालेकरांना बंगाली शिकवलं. विद्येकडून लोकसेवेकडे वळल्यामुळे पुढे ते ती भाषा विसरले ते सोडा. रंगराव दिवाकर पुढे फारच थोर पुरुष झाल्यामुळे पालेकरांना विसरले, तेही सोडा. तुरुंगातून सुटून आल्यावर त्यांनी मुंबईतल्या गिरगावात राजकारणाचा झेंडा उभारला. ह्या काळात स. का पाटील, सोवनी, काका तांबे, नरीमन, युसूफ मेहेरअली वगैरे चळवळ्या तरुणांशी ते एकरूप झाले. त्याकाळच्या निस्वार्थ राजकारणाच्या त्यांच्या आठवणी फारशा रुचकर नव्हत्या. एकदा मी त्याबाबत चाचपले असता ते फक्त इतकंच म्हणाले, "मांगलवाडीच्या समोर चिवडेवाल्या वेलणकरांचं दुकान आहे ना, तिथे काका तांब्याचं ताकाचं दुकान होतं. काका तिथे कट्ट्यावर बसून ताक विकायचे!"

## संपादक झाले तरीपण……

सर्वंवेळ देशसेवा त्यांना परवडेना. पण देशसेवेचा तर जीवाला ध्यास जडलेला. तेव्हा देह आणि आत्मा ह्या दोघांनाही तोषविणारा असा मासिक चालविण्याचा सांस्कृतिक व्यवसाय त्यांनी सुरू केला. पण नेम चुकला. मासिक थंड पडलं. दरम्यान, सध्या अमेरिकेत असलेल्या दत्तोपंत सावरकरांशो त्यांचं वळण होतंच. सावरकरांच्या 'श्री. लोकमान्या'त त्यांनी वृत्तपत्रव्यवसायाची धुळाक्षरं गिरवलो. तिथे पैशांची फारच कुतरओढ झाली. तेव्हा काही काळ मास्तरकी करून ते पुन्हा तलफेने पत्र-व्यवसायात आले. रात्रपाळ्यांचा चक्रनेमिक्रम करून, मंद गतीने चढत चढत 'नवशक्ती'च्या संपादकपदापर्यंत त्यांनी मजल मारली. प्रभाकर पाध्यांनी आग्रही धारदार आणि ललितरम्य लेखणीने 'नवशक्ती'ला पंख दिले होते. पाध्यांच्या पश्चात त्या पंखांमधले प्राण लोपतील अशी विद्वानांची अटकळ होती. पण अभिजात सरळपणा; सामान्य वाचकाची अचूक नाडीपरीक्षा, आणि सहकाऱ्यांची साथ ह्यांच्या बळावर त्यांनी तारू निभावून नेलं. आपल्या संपादकगिरीची नशा त्यांना कधीच चढली नाही. त्यांनी ना केली कुणावर कधी कुरघोडी, की ना चढवला आवाज. आपला आवाका ओळखणारे एक नम्र साथी हीच त्यांची कचेरीतली भूमिका होती. संपादकाच्या खुर्चीत बसूनही पालकर सहसंपादकासारखेच वागले. मुळातला हा साधा सरळमोट माणूस अखेरपर्यंत इतका बाळबोध राहिला की त्यांनी घरी आयता मिळत असलेला टेलिफोनसुद्धा घेतला नाही. मुंबईतल्या चलती असलेल्या दैनिकाचे संपादकपण भूषवूनही उभा जन्म त्यांनी जुन्या चाळीतल्या जुन्या भाड्याच्या दोन खोल्यात ढकलला. मी त्यांचा थेट पंचवीस वर्षे शेजारी होतो! त्यांचे खूप चढाउतार पाहिले. प्र. स. पक्षाच्या तिकीटावर नगरपालिकेत निवडून आल्यावर लोकांनी त्यांना मळवट भरून त्यांची ठाकुरद्वाराच्या नाक्यावरून दैवदुर्लभ मिरवणूक काढलेली पाहिली आणि नंतर त्यांची उपयुक्तता संपल्यावर त्याच लोकांनी त्यांच्याकडे चक्क कानाडोळा केल्याचंही पाहिलं. जर्मनीच्या सरकारने त्यांना पाहुणे म्हणून स्वखर्चाने जर्मनीला बोलावलं होतं. पण घरी सूट नाही म्हणून त्यांनी ते निमंत्रण परत पाठवलं. मी म्हटलं, 'अहो, एक सूट शिवायचा की.' त्यावर ते शांतपणे म्हणाले, 'सूट शिवायचा म्हणजे पैसे हवेत. शिवाय, जर्मनीहून परत आल्यावर त्या सूटाचं काय करायचं? त्यापेक्षा ते आमंत्रण पी. एल कडे वळलं हेच बरं झाल' पचवीस वर्षं ते धोतर, कफनी ह्या वेषात राहिले. त्यांनी शौक फक्त एक केला—सकाळी बटाटेवडे आणि शेंगाठ्या शांतपणे खाण्याचा आणि सारस्वती इमान फक्त एकाच गोष्टीशी राखले—पोटभर मासळी खाण्याचे. त्यांनी आणि आम्ही सेवादलवाल्यांनी ठाकुरद्वारातली एकजात सगळी गटारं धुंडाळून काढली—सफाईच्या सात्त्विक निमित्ताने अनेकांना त्यांनी लिहितं केलं. शिवसेनेचे

प्रमोद नवलकर हे त्यातलं ठळक उदाहरण. शेकडो गरजू माणसांचा त्यांच्या घरी राबता असे. निरपेक्षपणे ते सर्वांना मदत करीत. नाटकवाल्यांकडून मात्र चार सिटांच्या पासाची त्यांची सहेतूक अपेक्षा असे. नाटकवाल्यांनीही त्यांचो हौस मनसोक्त पुरवली. मात्र पालेकरांनी संपादकाचो खुर्ची खाली केल्यावर आपल्या ब्रीदाला स्मरून नाटकवाल्यांनी त्यांना निष्ठापूर्वक टाळलं. पालेकरांनीही नाटकं कटाप केली.

## जमा एकढीच

संपादक म्हणून वयोमानपरत्वे निवृत्त झाल्यावरही आर्थिक कोंडी होऊ न देण्यासाठी पालेकरांना पुनरपी सहसंपादकाची नोकरी स्वीकारणं भाग पडलं. हे दिसायला कससच होतं. म्हणून मी त्यांना हटकलं. तेव्हा ते शांतपणे म्हणाले, 'हीच आम्हा लोकांची शोकांतिका आहे. एक नाव सोडल्यास काय मिळालं आमच्या पिढीतल्या लोकांना ? आमच्या ओढगस्तीचं मूळ कारण काही समाजसेवक संपादकांनी स्वत: कंगाल राहून आमच्यावरहो त्यागाची सक्ती केली हे आहे. ते अधिक पगारासाठी मालकाशी कधीही बोलले नाहीत की भांडले नाहीत. कारण त्यांचं समाजसेवकपण त्यांच्या डोक्यात चढलं होतं. परिणामी मालक श्रीमंत झाले. आम्ही कफल्लक राहिलो. आता मी सत्तरीत आलो. पण नोकरी न करून माझं भागण्यासारखंच नाही. खूप काम पडतं. पण करणं भागच आहे.' निगर्वी वृत्तीचे पालेकर अलीकडे आत्मारामाच्या चाळीचे जिने चढता उतरता थांबू लागले. थकू लागले. जरा त्यांच्या जाडजूड देहाचा कबजा घेत होती. आता हे विश्रांती घेतील तर बरं असं पाहाणाऱ्याला वाटू लागल. पण अखेरपर्यंत ते सहसंपादक म्हणून प्रुफं तपासीत राहिले. आणि वेळ आली तेव्हा एका शांत रामप्रहरी त्यांच्या हृदयाचं यंत्र अचानकपणे बंद पडलं. काळोख झाला. रीतीप्रमाणे साहित्यसंघात शोकसभा बोलावली गेली. वेळ संध्याकाळी पाचची जाहीर झाली. त्यावेळी फक्त चार दोन माणसंच आली. फळ्यावर सहाला सभा सुरू होईल असं लिहिलं तोपर्यंत दहा पंधरा माणसं जमली. मग ह्याची वाट बघ, त्याची वाट बघ, असं करीत साडेसहाला सभा सुरू झाली. उपस्थिती जेमतेम होती. ज्यांना पालेकरांनी मोठं केलं ते अर्थातच गायब होते. म्हणजे ब्रिटीश कंपनीतली सुखासीन नोकरी लाथाडून मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी कठोर कारावास पत्करलेल्या, सहसंपादक म्हणून आयुष्य आटवलेल्या, शेकडो लेखक, कवींना, नट-नाटककारांना कलावंतांना प्रकाशात आणलेल्या, सर्वांशी सरळ आणि समान वागलेल्या, साधनशुचितेवर नितांत श्रद्धा ठेवलेल्या निष्कांचन आणि कष्टाळ पालेकरांचं अखेर काय झालं ? पालेकरांच्या बाजूने इतकं तरी नक्कीच म्हणता येईल की, इतरांना जमलं नाही ते पालेकरांना साधलं – ते म्हणजे त्यांनी सर्वांकडून भलं म्हणवून घेतलं ! वाईट इतकंच वाटतं की इतरांकडून भलं म्हणवून घेण्याच्या नादात ते स्वत: मात्र खडूसारखे झिजले.

□ □ □

# स्वतंत्र तेलंगण राज्य ?

विजय वैद्य

मधूनच कुठेतरी एखादी पोट-निवडणूक होते आणि चुरशीची पोट-निवडणूक म्हणून साऱ्या देशाचं लक्ष वेधून घेते. १८ ऑक्टोबर रोजी अशी एक निवडणूक खुद्द मुंबई शहरात झाली. सुमारे महिन्याभराच्या अंतरानं तितक्याच चुरशीची एक निवडणूक हैद्राबादपासून साधारणपणे १०० किलोमीटर अंतरावरील सिद्दीपेठ येथे झाली. या निवडणुकीनंही साऱ्या देशाचं लक्ष वेधून घेतलं होतं.

तेलंगणाच्या प्रश्नानं गेल्या वर्षी अत्यंत उग्र स्वरूप धारण केलं होतं. आज जरी त्या प्रश्नावर चळवळ चालू नसली तरी ती मृतवत झाली असं म्हणणं धाष्टर्याचंच ठरेल. अजूनही आग धुमसतेच आहे. कदाचित ही वादळापूर्वीची शांतताही ठरू शकेल.

सिद्दीपेठ निवणुकीच्या सुमारास मी हैद्राबादमध्ये होतो. आणि खुद्द निवडणुकीच्या दिवशी सिद्दीपेठ येथेच होतो.

तेलंगण संयुक्त आघाडीचे अध्यक्ष श्री. व्ही. वी. राजू यांची राज्यसभेवर निवड झाल्यामुळे आंध्रप्रदेश विधानसभेची सिद्दीपेठ येथील जागा रिकामी झाली होती. त्या जागेसाठी १५ नोव्हेंबर रोजी झालेल्या निवडणुकीत तेलंगण प्रजासमितीचे उपाध्यक्ष व तरुण नेते श्री. मदन ए. मोहन यांचा दणदणीत विजय झाला.

निवडणुकीकडे सर्वांचं लक्ष जाण्याचं कारण स्वतंत्र तेलंगण राज्याची जोरदार मागणी करणाऱ्या प्रजा.समितीचा उमेदवार आणि त्याच्याविरुद्ध अभंग आंध्रप्रदेश राज्याचा पुरस्कार करणाऱ्या सत्तारूढ काँग्रेस आणि उजव्या साम्यवादी पक्षांचे

उमेदवार यांच्यात त्रिपक्षीय लढत होती हे होय. शिवाय सहा महिन्यांपूर्वीच खुद्द हैद्राबाद शहरातील खैरताबाद येथील पोट-निवडणुकीत तेलंगण प्रजा समितीचे उमेदवार श्री. नागम कृष्णराव हे सत्तारूढ काँग्रेसच्या श्री. एस्. यादगिरी यांचा १३,९९२ मतांनी पराभव करून आंध्रप्रदेश विधानसभेवर निवडून आले होते. खुद्द राजधानीत सत्तारूढ काँग्रेस आणि मुख्यमंत्री श्री. कासु ब्रह्मानंद रेड्डी यांना हा एक जबरदस्त तडाखा होता. पण या निवडणुकीनंतर राजकीय रंगमंचावर काही हालचाली झाल्या होत्या. राजकारणाचे रंग पालटले होते. स्वतंत्र तेलंगण-वाद्यात फूट पडली होती, तर केंद्रात आणि सर्वसाधारणपणे देशात इतरत्र सत्तारूढ काँग्रेसला साथ देणाऱ्या उजव्या साम्यवादी पक्षानेही सिद्दीपेठ निवडणुकीत अभंग आंध्रप्रदेश राज्याचा पुरस्कार करणाऱ्या काँग्रेसला पाठिंबा देण्याऐवजी आपला उमेदवार उभा करण्याचा निर्णय घेतला. मेढक जिल्ह्यात (सिद्दीपेठ तालुका याच जिल्ह्यात येतो) स्वतंत्र तेलंगणवाद्यात दोन तट पडले आहेत. डॉ. एम्. चेन्ना रेड्डी (तेलंगण प्रजसमितीचे अध्यक्ष) यांचा एकेकाळचा उजवा हात समजले जाणारे श्री. एम्. बागा रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली एक गट आणि राज्य विधानसभेतील तेलंगण संयुक्त आघाडीचे नेते श्री. एन्. रामचंद्र रेड्डी यांचे नेतृत्व मानणारे श्री. पी. रामचंद्र रेड्डी यांचा दुसरा गट. शिवाय स्वतंत्र तेलंगण राज्याचा पुरस्कार करणारे व त्यासाठी मंत्रिपदाचा त्याग करून काँग्रेस विरूद्ध बंड पुकारलेले तेलंगण प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्री. कोंडा लक्ष्मण बापूजी यांनीही प्रजा समितीचे उमेदवार श्री. ए. मदन मोहन यांच्या उमेदवारीला उघड विरोध केला होता.

त्यांनी तर चक्क म्हटलं होतं, 'समितीचा उमेदवार पडण्यानेच स्वतंत्र तेलंगण चळवळीच्या कार्याला हातभार लागण्यासारखं आहे.' त्यांच्या या विधानामागे काही कारणं आहेत. आणि या विधानाला अनेक स्वतंत्र तेलंगणवाद्यांचा पाठिंबाही होता व आहे. या सर्व गोष्टींचा उल्लेख पुढे येईलच. सिद्दीपेठ निवडणुकीच्या संदर्भात सबंध तेलंगणाचा प्रश्नच समजावून घेणं महत्वाचे आहे. वरील पार्श्व-भूमीवर सिद्दीपेठ निवडणूक चुरशीची न ठरती तरच नवल होतं.

तेलंगण प्रांतातील मेढक जिल्ह्यातील सिद्दीपेठ हे तालुक्याचं ठिकाण. हैद्राबाद-पासून सुमारे १०० किलोमीटर्सवर. सिद्दीपेठ शहराची लोकसंख्या सुमारे २२ हजार. आणि तालुक्यातील या विधानसभा मतदारसंघात एकूण ७५ खेड्यांचा समावेश. सबंध तालुक्याची लोकसंख्या १ लक्ष, त्यापैकी एकूण मतदारांची संख्या ७३,२०८ एवढी.

## अतिरथींविरुद्ध सामना

तेलंगण प्रजासमितीचे उमेदवार होते श्री. ए. मदन मोहन तर गुरूव रेड्डी हे उजव्या साम्यवादी पक्षाचे उमेदवार आणि सत्तारूढ काँग्रेसतर्फे निवडणूक लढविली ती श्री. पी. व्ही. राजेश्वर राव यांनी. यापैकी श्री. राव व श्री. रेड्डी हे तेथील

मतदारांना परिचित असणारे होते कारण गेल्या चार सार्वत्रिक निवडणुकींपैकी तीन निवडणुका त्या दोघांनीही याच मतदार संघातून लढविल्या होत्या आणि प्रत्येकी एकदा असे ते दोघेही याच मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून विधानसभेत निवडून आलेले होते. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत श्री. रेड्डी यांनी श्री. राजेश्वर राव यांचा पराभव केला होता तर दुसऱ्या निवडणुकीत श्री. राव यांनी याची भरपाई करून श्री. गुरूव रेड्डी यांना पराभूत केलं होतं. तर तिसऱ्या निवडणुकीत साम्यवादी पक्षाच्या पाठिंब्यावर एक अपक्ष उमेदवार निवडून आले होते आणि गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसचे उमेदवार श्री. व्ही. बी. राजू निवडून आले होते. (गेल्या निवडणूकीत श्री. राजू यांना २४ हजारांवर मतं मिळाली तर उजव्या साम्यवादी पक्षाच्या उमेदवाराला जवळ जवळ १३ हजार मत पडली. मार्क्सवादी साम्यवादी पक्ष आणि जनसंघ यांना अनुक्रमे ३,५०० व ३००० एवढी मतं मिळवता आली.)

श्री. ए. मदन मोहन यांनी प्रथमच निवडणूक लढविली होती. श्री. मदन मोहन हे तेलंगण प्रजासमितीच्या संस्थापक सदस्यांपैकी असून ते समितीचे पहिले अध्यक्ष होते. आज ते श्री. चेन्ना रेड्डी यांच्या अध्यक्षतेखालील प्रजा समितीचे उपाध्यक्ष आहेत.

नव कॉंग्रेस आणि तेलंगण प्रजासमिती यांच्यामध्ये मतं विभागली जातील तर उजव्या व मार्क्सवादी पक्षाची मतं आपल्याला मिळतील असा अंदाज उजव्या साम्यवादी पक्षानं केला होता. श्री. चेन्ना रेड्डी यांच्या 'दिवाळखोर व बदनाम' नेतृत्वाला कंटाळल्यामुळे मेढक जिल्ह्यातील तेलंगण प्रजासमितीत जी फूट पडली आहे (यासंबंधीचा उल्लेख सुरुवातीला आला आहे.) त्याचा फायदा मिळून कॉंग्रेस उमेदवार सहज निवडून येईल असा कॉंग्रेसचा होरा होता. कोणताही उमेदवार निवडून आला तरी फारच थोडया मतांनी तो विजयी होईल, याबाबत सर्वसाधारण एकमत होतं. पण प्रत्यक्षात श्री. मोहन यांनी दणदणीत विजय मिळविला. खैरताबादपेक्षा येथे जरा जड जाईल' अशी टी. पी. एस्. (तेलंगण प्रजा समिती) च्या नेत्यांची भावना होती पण त्यांनी कंबरा कसल्या होत्या, आव्हानं प्रती आव्हानं दिली गेली होती. 'समिती हरल्यास, आपला गाशा गुंडाळील मात्र कॉंग्रेस हरल्यास मुख्यमंत्री श्री. कासु ब्रह्मानंद रेड्डी यांनीही आपलं चबुगबाळं आवरावं.' असं डॉ. चेन्ना रेड्डी यांनी आव्हान दिलं होतं.

खरी लढत अर्थातच नवकॉंग्रेस आणि टी. पी. एस्. यांच्यातच होती आणि प्रचारासाठी दोन्ही बाजूचे अतिरथी महारथी, मंत्रिगण सिद्दीपेठ येथे तळ ठोकून होते. सिद्दीपेठ शहरातील वातावरणात मला थोडीफार तंगीच आढळली. निवडणुकीच्या दिवशी शहरातील टी. पी. एस् आणि नवकॉंग्रेसच्या अनुयायात बाचाबाची झालीच आणि पुढे काही अनर्थ होऊ नये, मतदान शांतपणे पार पडावं

म्हणून पोलिसांनी जमावाला पांगविण्यासाठी अश्रूधुराच्या दोन नळकांडचा फोडल्या.

१५ नोव्हेंबरची निवडणूक, वरील प्रसंग वगळता अत्यंत शांतपणे पार पडली. एकूण ६५ टक्के मतदान झाल्याची माहितगार गोटांची बातमी होती. मतमोजणी सिद्दीपेठ येथेच झाली. आणि सुरुवातीपासूनच श्री. मदन मोहन हे त्यांच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा आघाडीवर होते. दुपारच्या सुमारास जेव्हा १०१ पेटचांपैकी २४ पेटचातील मतमोजणी पुरी झाली होती तेव्हा ते ४ हजारापेक्षा अधिक मतांनी आघाडीवर होते. अर्थातच जसजशी पेटचांची संख्या कमी होत होती तसतशी ही आघाडी वाढत होती. त्यामुळे कोणताही उमेदवार निवडून आला तरी तो जास्तीत जास्त ४ ते ५ हजार मतांनी आघाडी मारील हा अंदाज खोटा ठरू लागला आणि शेवटी श्री. मोहन हे प्रचंड मतांनी निवडून येणार हे निश्चित झालं.

मतदानाचे आकडे पुढीलप्रमाणे–

| | |
|---|---|
| एकूण मतदान | ७३,२०८ |
| एकूण मतदान | ५१,८५३ |
| बाद मतं | ०१,५८४ |
| श्री. मदन मोहन (टी. पी. एस्.) | ३१,६३३ |
| श्री. पी. व्ही. राजेश्वर राव (कॉं. सत्तारूढ) | ११,५६३ |
| श्री. गुरुव रेड्डी (उजवा साम्यवादी पक्ष) | ७,०७३ |

श्री. गुरुव रेड्डी यांची अनामत रक्कम जप्त झाली.

टी. पी. एस्. च्या दृष्टीनं या विजयाला फार मोठं महत्त्व होतं. कारण त्यामुळे त्यांचा दुसरा सदस्य आंध्र विधानसभेत जाऊन त्यांच्या स्वतंत्र तेलंगण राज्याच्या मागणीला अधिक धार येणार आहे. त्यांचा निवडणुकीत पराजय झाला असता तर तो चळवळीच्या दृष्टीनं आघात ठरला असता. कॉंग्रेसनं तसं काही विशेष गमावलं असं नाही. कारण विधानसभेत त्यांना बहुमत आहेच. त्यामुळे एखादी जागा अधिक मिळण्यानं विशेष साधलं जाणार नव्हतं. पण पराजय म्हटला की त्यामुळे आघात हा आलाच. साम्यवादी पक्ष ही निवडणूक जिंकता तर सत्तारूढ कॉंग्रेसबरोबर आगामी निवडणुकीत समझोता करताना, जागा वाटपाबद्दलचा सौदा करताना त्यांचा सूर वरच्या पट्टीत येऊ शकला असता. त्यामुळे या विजयानं टी. पी. एस्. आणि स्वतंत्र तेलंगणवादी यांच्या वर्तुळात उत्साहाचं वातावरण भरून राहिलं आहे. दुसऱ्या दिवशी सिकंदराबाद येथून श्री. मदन मोहन यांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली होती, व नंतर हैद्राबाद येथील पब्लिक गार्डन्स येथे विजयोत्सव साजरा करण्याकरिता प्रचंड सभाही घेण्यात आली.

## चळवळीची व्याप्ती

टी. पी. एस्. चा हा विजय अर्थपूर्ण समजायला हरकत नाही. या निवडणुकीसंबंधी निरनिराळ्या प्रतिक्रिया या संदर्भात महत्त्वपूर्ण आहेत. निवडणुकीचे पडसाद

दूरगामी ठरतील असे आहेत. निवडणुकीतील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे प्रजा समिती की जी पूर्वी फक्त स्वतंत्र तेलंगणवाद्यांची आघाडी होती, ती या निमित्तानं राजकीय पक्ष म्हणून पुढे आली आहे. श्री. चेन्ना रेड्डी यांचं नाव तेलंगणात तसं बदनाम झालं आहे. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या वेळी मेडॆक जिल्ह्यातील नेते एकतर सत्तारूढ कॉंग्रेसच्या बाजूने तरी उभे ठाकले किंवा प्रजा समितीचे कट्टर विरोधक म्हणून पुढे आले.

अनेक स्वतंत्र तेलंगणवाद्यांना असं वाटत होतं की स्वतंत्र तेलंगण राज्याची मागणी करायची आणि त्याच वेळी आंध्र प्रदेश विधानसभेसाठी निवडणूक लढवायची म्हणजे आंध्र प्रदेशात रहायला मान्यता देण्यासारखंच आहे. ज्यांना या निमित्तानं तेलंगण चळवळ किती उग्र आहे हे देशाला दाखवून देणं आवश्यक वाटत होतं, त्यांचा डॉ. एम्. चेन्ना रेड्डी यांच्या टी. पी. एस्. च्या नेतृत्वाला तर विरोध होताच पण तेथे उभा करावयाचा उमेदवार टी. पी. एस्. तर्फे उभा न करता सर्व स्वतंत्र तेलंगणवाद्यांतर्फे उभा केला जावा असंही ठामपणे त्यांना वाटत होतं. यामुळे स्वतंत्रवाद्यातही मतभेद होते. म्हणूनच "हा विजय टी. पी. एस्. चा नसून जनतेचा आहे" असं श्री. कोंडा लक्ष्मण बापूजी यांना वाटलं. मुख्यमंत्री श्री. रेड्डी यांची प्रतिक्रिया अशी की उजव्या साम्यवादी पक्षानं उमेदवार उभा केल्यामुळे मतं फुटली, म्हणूनच ह्या निकालानं त्यांना आश्चर्य वाटलं नाही. (साम्यवादी उमेदवार उभा नसता आणि कॉंग्रेस टी. पी. एस्. यांच्यातच सरळ सामना झाला असता तरीही एकूण मतांची विभागणी पहाता कॉंग्रेस उमेदवार निवडून आला असता अशी शक्यता नव्हतीच.) खैरताबाद निवडणुकीमुळे तेलंगण चळवळ हैद्राबाद, सिकंदराबाद येथेच फक्त उग्र आहे असा काही जणांचा ग्रह झाला होता. पण

---

## चळवळीमुळे झालेली हानी

५६ बसेस जाळण्यात आल्या. पैशात त्यांची किंमत २५ लक्ष रुपये. १४३९ बसेसची मोडतोड झाली. १ लक्ष ८३ हजार रुपयांचे यामुळे नुकसान. राज्यपरिवहन मंडळाला ४ कोटी ६६ लक्ष रुपयांची हानी पोहोचली. राज्य विद्युत मंडळाचं १० लाख रुपये नुकसान झालं. भारतीय रेल्वेच्या नुकसानीचा आकडा आहे ६५ लाख ४५ हजार. इतर अनेक फुटकळ रकमा धरता ५० कोटी रुपयांची हानी झाली.

अनेक तरुण व ज्यांचा चळवळीशी संबंधही नव्हता अशी माणसं नाहक प्राणाला मुकली.

तेलंगणातील सर्वच विद्यार्थ्यांचं एका शैक्षणिक वर्षाचं नुकसान है ही एक महत्त्वाचं राष्ट्रीय नुकसानच होय.

---

सिद्दीपेठच्या विजयामुळे ती खेड्यापाड्यातही तितकीच किंबहुना अधिक उग्र याचा प्रत्यय आता सर्वांनाच आलेला आहे.

तेलंगण संयुक्त आघाडीचे एक नेते श्री. के. आर. वीरस्वामी मला म्हणाले, " काँग्रेसची प्रचंड संघटना, हाती असलेला मुबलक पैसा या गोष्टी असूनही काँग्रेसचा पराजय झाला हे आता तरी प्रधानमंत्र्यांनी समजावून घ्यावं आणि तेलंगणातील लोकांचा, त्यांना आपल्या प्रागतिक धोरणांना पाठिंबा हवा असल्यास ७२ पूर्वीच त्यांनी स्वतंत्र तेलंगण राज्याची मागणी मान्य करावी. " विद्यार्थी नेते श्री. श्रीधर रेड्डी यांना मी उस्मानिया विद्यापीठाच्या आवारात भेटलो. दाढी वाढविलेला. खूपसा गंभीर असा हा तरुण मितभाषीच आहे. निदान दुसरे तरुण विद्यार्थी नेते श्री. मल्लिकार्जुन यांची भेट घेतल्यावर तर हा फरक अधिकच जाणवला. मल्लिकार्जुन यांच्यात जनसमुदायाला त्यांच्या मागून यायला लावण्याची शक्ती असल्याचं प्रत्यंतर येतंच येतं. गोड स्वभावामुळे व इतरांना समजावून घेण्याच्या व आपले मुद्दे इतरांना बिनतोडपणे समजावून सांगण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे ते सर्वसाधारणपणे कोणालाही थोड्याच काळात जिंकू शकतात. श्री. श्रीधर रेड्डी म्हणाले, " जनतेनं तेलंगण चळवळीला या निवडणुकीद्वारे ठाम पाठिंबा दिला आहे. केंद्रिय नेत्यांनी शहाणपणानं स्वतंत्र तेलंगण राज्य देण्याचं नाकारलं तर आज सत्तेवर असणाऱ्यांना जनता ७२ साली उखडून काढील. " श्री. मल्लिकार्जुन यांना असं वाटतं की, " निवडणुकीत खेड्यापाड्यातील लोकांनाही चळवळीवरील त्यांची निष्ठा दाखवून दिली आहे. "

" ७२ सालच्या निवडणुकीत टी. पी. एस्. तेलंगणातील सर्वच्या सर्व जागा जिंकेल " असा विश्वास श्री. मदन मोहन यांच्यासकट अनेकांनी माझ्याजवळ व्यक्त केला.

विजयोत्सवाच्या सभेत बोलताना श्री. चेन्ना रेड्डी म्हणाले की, ' प्रधानमंत्री श्रीमती गांधी यांचा ठाम निर्णय घेण्याबाबत लौकिक आहे. त्यांनी हिमाचल प्रदेश, मेघालय, त्रिपुरा व मणिपूर यांना स्वतंत्र राज्यांचा दर्जा दिला आहे. तेव्हा खैरताबाद, सिद्दीपेठचा निर्णय विचारात घेऊन त्या आमचीही मागणी लवकरच मान्य करतील. " या निवडणुकीच्या निमित्तानं आंध्र प्रदेश संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. पी. सम्बिया यांनी त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय कृतिसमितीकडे आंध्र प्रदेश व तेलंगण प्रदेश असे सं. स. प. चे दोन गट निर्माण करण्याची परवानगी मागितली असून स्वतंत्र तेलंगण राज्याच्या निर्मितीला पाठिंबा दिला आहे.

टी. पी. एस्. नं खैरताबाद व सिद्दीपेठ येथे प्रचंड विजय मिळविले खरे पण त्यातून काही प्रश्न निर्माण झाले आहेत. खैरताबाद निवडणुकीच्या सुमारासच तेलंगणात पचायत समितीच्या निवडणुका झाल्या आणि तेथे समितीनं उमेदवार उभे केले नाहीत. त्यांनी सारी शक्ती खैरताबाद येथे पणाला लावली. त्यामुळे

ज्या तेलंगणासाठी चळवळ झाली तेथे आज ९५ टक्के पंचायत समित्या व सर्वच्या सर्व म्हणजे नऊ जिल्हा परिषदांचे अध्यक्ष मुख्यमंत्र्यांच्या अधिपत्याखालील मंडळी आहेत. याचे परिणाम कदाचित ७२ साली दिसून येतील अशी शक्यता आहे.

## चेन्ना रेड्डींचे बदनाम नेतृत्व

दुसरी गोष्ट म्हणजे श्री. मदन मोहन हे खरे चळवळीचे सर्वमान्य नेते, स्वतंत्र तेलंगण राज्याची निर्मिती झालीच तर पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांचं नाव लोक घेत असत. इतरांनी ७२ सालच्या निवडणुकीत आपली उमेवारी पदरात पाडून घेण्यासाठी त्यांच्या दाराचे उंबरठे झिजवायचे त्या श्री. मदन मोहन यांना स्वतःच्या उमेदवारीसाठी डॉ. चेन्ना रेड्डी यांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या, अनेकांकरवी त्यांना उमेदवारी देण्यासंबंधी डॉ. रेड्डी यांच्याकडे तरफदारी करावी लागली. प्रजा समितीचे पहिले अध्यक्ष असलेले हे विधिज्ञ आज डॉ. रेड्डी यांच्या मुठीत आहेत. त्यामुळे स्वतंत्र राज्याची मागणी मान्य झालीच तर एखादे मंत्रालय मिळण्यापलीकडे त्यांना काही मिळेल असं आज जाणकारांना तरी वाटत नाही. (राज्य आज ना उद्या अस्तित्वात येणार आणि आपणच राज्याचे मुख्यमंत्री होणार अशी आशा श्री. चेन्ना रेड्डी, श्री. मदन मोहन आणि श्री. कोंडा लक्ष्मण बापूजी यांना वाटते.) तेलंगणाची चळवळ जोरात सुरू झाल्यानंतर आणि थोड्याच काळात

---

## प्रचार : तेलंगण पद्धतीचा

जनमानसाच्या भावनांना आळविण्याची प्रचाराची आगळी पद्धती तेलंगण प्रजासमितीनं यावेळी अवलंबिली होती. भिन्ती पत्रकांवर गेल्यावर्षीच्या चळवळीच्या काळात जे तरुण व विद्यार्थी गोळीबारात ठार झाले होते त्यांची छायाचित्र होती. दुसरच्या वेळी तरुण विद्यार्थिनी अशाच प्रकारचे व सरकारच्या 'अत्याचारा'चे पुरावे असलेले छायाचित्राचे अल्बम्स घेऊन घरोघरी फिरून महिलांना ते फोटो दाखवीत आणि त्यांच्या आत्म्याला शांती लाभावी म्हणून मतदारांनी टी. पी. एस्. च्या उमेदवारास मत द्यावीत' असं आर्जवून सांगत असत.

कॉंग्रेसचे प्रचारक जीवित हानी झाल्याचं कबूल करीत. पण टी. पी. एस्च्या 'दिवाळखोर नेतृत्वामुळे'च हे सर्व झालं. सांगून कॉंग्रेसला मत म्हणजे श्रीमती गांधींच्या प्रागतिक धोरणांना मत असं मतदारांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करीत. सिद्दीपेठ मधील भितन भित घोषणांनी आणि पत्रकांनी भरलेली होती. प्रचार समाप्ती अगोदर अनेक जिप्स व मोटारी, प्रचारकांचे तांडे घोषणांची आतीषबाजी आदींची अगदी झुंबड उडालेली होती - असं स्थानिक लोकांनी मला सांगितलं.

---

कदाचित स्वतंत्र राज्याची मागणी पदरात पडेल असे दिसू लागल्यावर अनेक संधिसाधू राजकारणी, त्यांचा चळवळीला असलेला सुरुवातीचा प्रखर विरोध विसरून तेलंगणवादी झाले. मात्र श्री. मदन मोहन व श्री. कोंडा लक्ष्मण हे त्याला अपवाद. श्री. बापूजींचा विरोध होता खरा, पण त्यांनी मंत्रिपदाला तिलांजली देऊन ते चळवळीत उतरले हा तेथे मोठा त्याग समजला जातो. महत्त्वाकांक्षी असलेले अॅड. मदन मोहन यांना श्री. प्रताप किशोर या पत्रकारांनी सुरुवातीलाच चळवळीत आणून त्यांना प्रजासमितीचं अध्यक्षपद दिलं. डॉ. रेड्डी यांनी निवडणुकीत गैरव्यवहार केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयानं त्यांची निवडणूक अवैध ठरवून त्यांना काही वर्षे निवडणुकीत भाग घेण्यास मनाई केली आहे. पक्के राजकारणी असलेले श्री. चेन्ना रेड्डी यांनी हे सर्व ओळखून चळवळीत उडी टाकली व चळवळीचा पूर्ण फायदा आज त्यांना मिळत आहे. लोकांचा असा ठाम ग्रह झाला आहे की फक्त तेच ही चळवळ पुढे चालवू शकतील. डॉ. रेड्डी यांच्या गैरव्यवहाराबाबत लोकांशी बोलून, अशा या नेत्याला तुम्ही का जवळ करता असा प्रश्न करताच, "आम्हाला दुसरा माणूस दाखवा" असा लोकांचा खडा सवाल असतो.

डॉ. चेन्ना रेड्डी हे आंध्रप्रदेशचे अर्थमंत्री होते. स्वतः ते तेलंगणातील आहेत, पण त्यांनी तेथील विकासाकडे दुर्लक्ष केलं. मागे श्री. कोंडा लक्ष्मण बापूजींबद्दलचा, त्यांनी श्री. मोहन यांच्या उमेदवारीला विरोध केल्याचा उल्लेख आहे. त्याच म्हणणं असं डॉ. रेड्डींसारख्या तेलंगणातील लोकांनी मंत्रिपदावर असताना जर तेलंगणकडे लक्ष दिलं असतं तर हा प्रश्नच उद्भवला नसता. रेड्डींसारख्या बदनाम नेतृत्वाखाली टी. पी. एस्. ती निवडणूक लढवीत असल्यानेच त्यांनी हा विरोध केला. (रेड्डींच्या नेतृत्वामुळे चळवळीला खूपच हानी पोचली असल्याचं अनेकांचं ठाम मत आहे) १९५६ साली डॉक्टर साहेबांनी तेलंगण चळवळ सुरू केली पण केंद्राचा दबाव येताच ती अर्धवट सोडली. ५८ साली श्री. राजगोपालाचारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विजयवाडा येथील सभेत जाहीरपणे ते म्हणाले होते, "कृष्णानदीत उडी मारीन पण परत कॉंग्रेसमध्ये जाणार नाही." असे हे डॉ. रेड्डी पुन्हा कॉंग्रेसमध्ये आलेच पण सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर कॉंग्रेसमध्ये राहून त्यांना टी. पी. एस्. चं नेतृत्व हवं होतं. (आणि सर्व काही प्रकार करून त्यांनी टी. पी. एस्चं अध्यक्षपद मिळवलंच.) पक्ष शिस्त मोडणाऱ्याकडे नेतृत्व द्यायला टी. पी. एस्च्या अनेक संस्थापक सदस्यांचा प्रखर विरोध होता. त्यांनी शेवटी वेगळं घरकुल उभारून श्रीधर रेड्डी विद्यार्थी नेत्याला पुढे आणून दुसरी टी. पी. एस् स्थापन केली. तेलंगण चळवळ जोरात असताना श्रीमती गांधी ३६ तासांच्या मुक्कामासाठी हैद्राबाद येथे होत्या. त्यावेळी श्री. चेन्ना रेड्डी यांनी त्यांना अपमानास्पद वागणूक दिली. कारण की सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर त्यांनी तात्काळ मंत्रिपद सोडावं असं श्रीमती गांधी यांनी सुचवल्यामुळे त्यांच्यावर

डॉ. रेड्डी यांचा राग. काही जाणकारांच्या मतें स्वतंत्र तेलंगण राज्याची मागणी मान्य करण्याच्या मूडमध्ये प्रधानमंत्री होत्या पण रेड्डींच्या या वागणुकीमुळे व तें टी. पी. एस्. चे व पर्यायाने तेलंगण चळवळीचे नेते असल्याने त्यांनी ती मागणी मान्य केली नाही. असे हे चेन्ना रेड्डी आजही आंध्रप्रदेशाच्या राजकारणात एक बडं प्रस्थ आहेत. आंध्रप्रदेशचं राजकारण म्हणजे रेड्डी आणि राव यांचा गोंधळ होय.

या गोंधळाचे दुसरे मानकरी आहेत श्री. के. ब्रह्मानंद रेड्डी. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री.

तेलंगणात चळवळ सुरू झाल्यानंतर तो प्रश्न समजावून घेऊन, तेलंगी लोकांना विश्वासात घेऊन सोडविण्याऐवजी त्यांनी तो कायदा, सुव्यवस्था आणि प्रतिष्ठा यांचा प्रश्न केला. त्यांच्या सरकारनं व पोलिसांनी त्यात भर घातली. चळवळ चालविणारेच त्यावेळीं पोलिसांना चिथावणी देत. हा त्यांच्या रणनीतीतील डावपेच होता. त्याचा योग्य तो परिणाम होई. पोलीस वाटेल त्याला—ज्याचा चळवळीशी संबंधही नाहीं—अशा माणसाला मारझोड करीत. परिणाम चळवळ दिवसेंदिवस जोरात वाढत होती. सी. आर. पी. व एस्. आर. पीं. हे बहुधा चळवळ वाढविण्याच्या कामाकरिताच ठेवलेले असावेत असा संशय घेता येण्याजोगी त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणी कामगिरी बजावलेली आहे. मुंबईनं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत व गेल्या वर्षीच्या फेब्रुवारींत याचा अनुभव घेतला आहेच. यामुळे चळवळीत भरपूर तेल ओतलं गेलं आणि शेवटीं सारं निस्तरता निस्तरता मुख्यमंत्र्यांच्या नाकी नऊ आले.

श्रीमती गांधी यांना तेंलंगणातील चळवळ ही ब्रह्मानंद रेड्डी यांच्याविषयी असणाऱ्या द्वेषापाई उद्‌भवली असून पक्षातील अंतर्गत दुफळीचा तो परिणाम आहे असं सुरुवातीला वाटलं. पण पुढील उग्रता पाहून तसं नसल्याचं त्यांच्या ध्यानीं आलं. त्यावेळचे गृहमंत्री श्री. चव्हाण हे 'ओपन माइंड' घेऊन तेथें गेले होतें पण 'मिसलीडींग' असल्याचा तेंलंगणवाद्यांना अनुभव आल्याचं अनेकांनी मला सांगितलं.

कोंडा लक्ष्मण बापूजींना स्वतंत्र तेलंगण राज्याच्या मागणीला मान्यता मिळण्या-

---

## संस्थापक पत्रकार

तेलंगण प्रजा समितीची स्थापना कोणी राजकीय मंडळींनी केली काय ? छे. प्रजासमितीची स्थापना करणारे चौघेजण होते पत्रकार. प्रताप किशोर रघुवीर राव, रमाकांत आणि नरसिंग राव. आज मात्र चळवळीचं नेतृत्व करीत आहेत संधिसाधू राजकारणी. 'तेलंगणावर झालेला अन्याय दूर झालाच पाहिजे' या भावनेने या पत्रकारांनी प्रजा समिती स्थापन केली होती. राजकारण्यांनी ती आज आपल्या दावणीला बांधली आहे.

मध्य चव्हाण व जगजीवनराम हे 'अडथळा' असल्याचं वाटतं.

डॉ. चेन्ना रेड्डी यांनीं टीं. पी. एस्. चं राजकीय पक्षात रूपांतर करून ७२ च्या निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय महत्त्वाचा आहे. तेलंगणांतील सुमारे ९० ते १०० जागा टी. पी. एस्. जिंकू शकेल असा त्यांचा अंदाज आहे. ५६ साली तेलंगण प्रादेशिक समिती स्थापन झाली असून तेलंगणातील सर्व आमदार त्या समितीचे पदसिद्ध सभासद आहेत. ही समिती फक्त १० वर्षांच्या काळापुरतीच होती. तेलंगणसंबंधी सर्व निर्णय घेण्याचा समितीला अधिकार आहे. तेव्हा समितीवर प्रभुत्व ठेवण्याच्या दृष्टीनं श्री. चेन्ना रेड्डी यांनी हा निर्णय घेतला असावा. तसा प्रसंग आल्यास ब्रह्मानंद रेड्डी हे समितीची आवश्यकता नसल्याच्या सबबीवर तीं बरखास्त करू शकतील आणि डॉ. रेड्डी तेथे 'घटनात्मक पेचप्रसंगावर मग मात करू शकतील.

## राजकीय नरकपुरी

समजा स्वतंत्र राज्याची मागणी मान्य करण्यात आली तर तेलंगणाचं भवितव्य काय असा प्रश्न मी श्री. प्रताप किशोर (हैद्राबाद येथील 'डेक्कन क्रॉनिकल' या इंग्रजी दैनिकाचे ते पत्रकार आहेत आणि तेलंगण चळवळीचे पहिल्या दिवसापासून आजपर्यंतचे ते एक शिल्पकार आहेत. चळवळीचा सारा इतिहास त्यांना माहीत आहे) यांना विचारला. त्यांचं स्पष्ट मत "मग तेलंगण राजकीय नरकपुरी होईल. राज्य होणं अत्यंत आवश्यक आहे हे विदारक सत्य आहे. आंध्रातील प्रस्थापित लाचखोर नेतृत्व चळवळीच्या निमित्तानं दूर होईल आणि प्रामाणिक नेतृत्व पुढं येईल अशी लोकांची समजूत होती. ती मात्र खोटी ठरली आहे. हे नेतृत्व प्रस्थापित नेतृत्वापेक्षा अधिक वाईट आहे. म्हणूनच प्रामाणिक व चांगल्या नेतृत्वाचा लाभ तेलंगणास न झाल्यास तेथे नक्षलवाद फोफावण्याचीच शक्यता अधिक. चळवळ चालू असताना काही नक्षलवादी मला भेटले, ते चळवळीला मदत करायला तयार होते पण त्यांच्या अत्याचारी मार्गांनी. आमच्या मार्गांनी नव्हे. त्याच सुमारास एक विद्यार्थी नेता आला व मला म्हणाला ' डॉ. रेड्डी मला गाडी व दिवसाला २१ रुपये द्यायला तयार आहेत. तुम्ही काय देता बोला. यापेक्षा अधिक द्यायला तयार असाल तर तुमच्याकडे येतो." अली सिद्दीकी नावाचे एक जातीयवादी पत्रकार 'इबनुल वक्त' नावाचं जातीयवादी पत्र चालवितात. त्यांना १०० रिम्स कागद दिल्यास चळवळीच्या बाजून लिहायला ते तयार होते. आज हा जातीयवादी माणूस अखंड आंध्रप्रदेशाचा पुरस्कर्ता आहे आणि स्वतः मुख्यमंत्री त्यांची प्रधानमंत्र्याबरोबरही ओळख करून देत आहेत. सुव्यवस्था, कायदा आणि शासनाबद्दल आज कोणालाच आदर नाही. अहो माझी छोटी मुलगी पोलीस दिसताच दगड मारते. पोलीसाची तिला भीतीच नाही."

प्रताप किशोर यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. रस्त्यावर उघडपणे लाच खाणारा

पोलीस मी स्वत: पाहिला आहे. हैद्राबादची बस सर्व्हिस तर याचा उघड उघड पुरावा आहे. असलेल्या तिकिटाच्या निम्मे पैसे कंडक्टरला द्यायचे व तिकिटाशिवाय प्रवास करायचा हा राजरोसपणे चालणारा व्यवहार ठरला आहे. एकदा मी सिकंदराबादहून स्थानिक मित्रासमवेत हैद्राबादकडे येत होतो. तिकिटासाठी एक रुपया कंडक्टरकडे दिला. त्याने ६० पैसे परत दिले व स्वस्थपणे तो पहात राहिला माझ्याकडे. मलाही हे कोडं उलगडेना. मी तिकीटाचो मागणी करताच तो तेलगुं मध्ये ६० पैसे परत दिल्याचं म्हणाला ६० पैसे दिले खरे पण तिकीटाच काय? त्यानं उरलेले पैसे दिले होते अशी माझी समजूत होती. पण माझ्या त्या मित्रानं मला सर्व समजावून सांगितलं. तिकीटाचे एकूण ८० पैसे होतात. त्यानं फक्त चाळीस घेऊन ६० पैसे परत दिले आहेत. त्यामुळे तिकीट मिळणार नाही. वरिष्ठाकडे तक्रार देतों या दमदाटीखाली मी उरलेले ४० पैसे देऊन तिकीट घेतलं खरं, पण माझा मित्र व कंडक्टर दोघेही नाराज झाले. दुसऱ्या एका प्रसंगी सुमारे पन्नाशी ओलांडलेले एक गृहस्थ माझ्या शेजारी बसले होते. त्यांनी चक्क पाच पैसे देऊन प्रवास केला. उस्मानिया विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या बसेस म्हणजे कंडक्टर्सना पर्वणीच. याबाबत एका कंडक्टरला विचारताच तो म्हणाला 'साहेब, आमचा पगार हा आमच्या हातखर्चाप्रमाणे आहे. आमचा खरा पगार आम्हाला यातून मिळतो' यावरून कायदा व सुव्यवस्थेची कल्पना येऊ शकेल.

आंध्र सरकारच्या मते सरकारनं तेलंगणाचा प्रश्न हाताळण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. प्रादेशिक समिती आहेच. न्यायमूर्ती वांच्छू समितीच्या नोकऱ्यांबाबत विकेंद्रीकरण करण्याबद्दलच्या शिफारशी अमलात आणल्या गेल्या आहेतच. प्रधान मंत्र्यांनी सुचविलेला आठ कलमी कार्यक्रमही अमलात आणला गेला आहे आणि तेथील औद्योगिकरणाचा वेगही वाढविण्यात आला आहे. स्वतंत्र तेलंगण राज्यापेक्षा सर्वांनी एकसंध आंध्रप्रदेशात रहाण्यातच सर्वांचे कल्याण आहे असं सरकारला वाटतं आणि तेलंगण राज्याची निर्मिती म्हणजे मग रायल सीमा भागही स्वतंत्र राज्याची मागणी करणार! (आंध्र प्रदेशात तेलंगण, आंध्र व रायल सीमा असे तीन विभाग आहेत) विदर्भ, सौराष्ट्र, कोकण त्या मागोमाग आहेतच. म्हणजे देशाचे तुकडे असं सरकारी गटाचं म्हणणं.

यावरला उपाय म्हणजे मागचं सारं विसरून, आंध्र प्रदेशाच्या (तेलंगण रायल सीमेसहीत) विकासाकडे लक्ष देण्यात यावे यावर सरकार व एकसंध आंध्रवाले इतर पक्ष भर देतात. पण हा केवळ आर्थिक प्रश्न नसून आंध्र प्रदेशाच्या नेतृत्वानं तेलंगणावर लादलेल्या इतरही गोष्टींचा प्रश्न असल्याचा स्वतंत्रवाद्यांचा मुद्दा. या सर्व प्रश्नावर आजही तेलंगण धुमसतच आहे. पुन्हा कदाचित वेळ आली तर भडका उडायला कितीसा वेळ लागणार. भविष्यकाळात काय होईल ते आज तरी सांगता येणं शक्य नाही.

◻ ◻ ◻

# ती आणि तो

एम्. बी. शिंदे

त्या दोघांचा व्यवसाय प्रध्यापकाचा. त्यांच्या कोणच्याही चालीत या व्यवसायाचे गुण भरलेले.

आजही दोघे अगदी समांतर रेषेत चाललेले. दुपारच्या वामकुक्षीनंतर बऱ्याच वेळा ते ग्रंथालयात येऊन बसतात. आता तर अगदी सवयच. बहुधा बऱ्याच दिवसांनी मेतकूट जमले. फिरण्यासाठी थोडा मोकळा वेळ निघाला आहे. कसल्यातरी गप्पांना रंग भरलेला.

तो सांगत होता.

"अमेरिकन यादवी युद्धावरील पुस्तक मी नुकतेच वाचून काढले. लिंकनच्या प्रसंगावधानाचे अनेक प्रसंग पुस्तकात आहेत." तिचे कान ऐकताहेत पण नजर पुढे सरळ रेषेत. स्त्रियांनी नोकरी करावयाची तर नाकासमोर सरळ रेषेत नको का पहायला. स्त्री काचेचे भांडे संभाळून ठेवा, हा दुसरा घरचा धडा. घोळून घोळून तोंडपाठ झालेला आणि तोंडपाठ झाल्याने चांगलाच अंगात मुरलेला.

'एकदा काय झालं' त्याने सांगायास सुरवात केली. 'युद्धाचा समर प्रसंग कळसास पोहोचलेला. रोज पराभवाच्या नवीन बातम्या! वॉशिंग्टनमध्ये चिंतेची अवकळा. लिंकन चेहेऱ्यावर स्थिर पण अंःतकरणात अस्वस्थ! रोज नातेवाईकांच्या मृत्यूच्या वार्ता आणि चांगल्या सेनापतींची पिछेहाट! लिंकननी निर्धार केला. आता मात्र आपणाला युद्धआघाडीवर गेलेच पाहिजे.' सांगता सांगता त्याचा आवाज किंचित चढलेला. तिचे औत्सुक्य थोडेसे वाढलेले.

"मग हो?" तिने आपला वाऱ्याने उडणारा पदर सावरत विचारले.

"आघाडीवर गेले तोच त्यांच्यापुढे पहिल्या दिवशीच संकट उभे! एका मोठ्या गावात त्यांना आपली यादवी युद्धाची भूमिका पटवून द्यायची होती. गावाबाहेर स्टेशनवर लिंकनना थोडाच वेळ सभेसाठी होता. पावसाची भुरभुर असूनही चार-पाच हजाराचा समुदाय भाषणासाठी आणि त्यांना पहाण्यासाठी आतूर होता. पण

पाऊस कसला वस्ताद ! त्याने जो गोंधळ उडवून दिला त्यामुळे लोक लिंकनचे म्हणणे कसे ऐकणार ?"

"मग लिंकनने भाषण केले की नाही" तिची शंका.

"लिंकनही काही साधे वस्ताद नव्हते. ते विनोदी तसेच प्रसंगावधानी. वादळ शांत करण्यात कसबी ते ! आपल्या हॅटवरील बर्फ डाव्या हाताने त्यांनी दूर सारला व त्यांनी भाषणाला सुरवात केली."



तिची उत्सुकता शिगेला पोहोचली. किंचित तिची नजर त्याच्याकडे वळते. क्षणभरच !

तो आता रंगात आलेला असतो. फार दिवसांनी असा श्रोता एकांतात लाभलेला.

"लोकहो, शांत रहा. मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. फारच चांगली आणि विनोदी आहे. गोष्ट आहे एका गाढवाची. बिचाऱ्याने आयुष्यभर मालकाचे भले केले. वय वाढले. काम होईना. खायला कहार आणि धरतीला भार ! या गदर्भराजाचे काय करावे. मालकापुढे मोठाच प्रश्न पडला.— लिंकन थोडे थांबले. लोक कमालीचे शांत झाले. गाढवाच्या प्रश्नापेक्षा देशाचा प्रश्न मोठा आहे. असे म्हणून लिंकनमी वीस-पंचवीस मिनिटे भाषण केले. आणि लोकांनी अक्षरश: मूग गिळून ऐकले."

बाजूच्या झाडाची दोन-चार पाने सप्‌कन त्याच्या कोटावर आदळतात. चुटका संपताच तो म्हणतो– 'काही शंका !' ती खुदकन हसते. बऱ्याच दिवसात मोकळी मोकळी, दिलखुलास. समोर फुटपाथवर उघडे ड्रेनेजला वळसा घेऊन पुन्हा समांतर रेषेत. आता सारे वातावरण मुक्त ! बाजूच्या बंगल्यातून मोगऱ्याच्या कळ्या कशा धुंद. वास अंगाशी मस्ती करतोय. तिच्या पातळाशी आणि तिचे पातळ त्याच्या अंगाशी. धूसर काळोख डोकावू पहातो आहे. अजून त्या दोन चालत्या आकृती भासतात. झाडाच्या फांद्या खूप खाली वाकून दोघांना न्याहाळतात. काहीजण अंगावरून जातात. ह्यांनी अनेकदा हे भोगलेले. डोळ्यांच्या नजरा लवतात. ते दोघेही आता याकडे दुर्लक्ष करू लागली आहेत.

दोघांच्या नजरा प्रथमच भिडतात.

असे कोठपर्यंत चालायचे ! खूप दूर ! क्षितिजापर्यंत !! युगानुयुगे !!!

तिला आधार त्याला विश्वास मिळाला. मोठा जाडजुड ट्रक ओझी वहात फुरफुरत् निघून गेला. आपण गप्प आहोत याची त्यांना जाणीव झाली.

सरदारगृह

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय

हीरक-महोत्सवानिमित्त विविध सुखसोयी

अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह

सरदारगृह प्रा. लि.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था

" मिस् पर्वते, आपण कॉलेजमध्ये येण्यापूर्वी दुसरीकडे कोठे नोकरीचा अनुभव घेतला."

" होय, मी एका मोठ्या संस्थेत संशोधन-विभागात काम केले."

" मग आता तुमचे संशोधन चालू आहे किंवा कसे ?"

" तिथल्या डायरेक्टरांनी सांगितलं प्रत्यक्ष शिक्षणाचा थोडा अनुभव घ्या. म्हणजे तुमचे संशोधन अधिक फलदायी होईल."

" म्हणून तुम्ही येथे आला म्हणा की ! आम्ही विद्यापीठाची पदवी लाभताच सरळ येथे. चार वर्षांचा अनुभव पाठीशी. शिवाय मधून मधून लेखन !"

" तुम्ही आता इथे स्थिर झालात म्हणायचे !"

" छे ! स्थिर होणे जमणार असे दिसत नाही ?"

" का ?"

" वडिलांचे लकडे चालू आहे. शेती सांभाळ. एवढी मोठी शेती कोणाकडे द्यायची ? तिकडेच नवीन कॉलेज निघतंय वडील संस्थेचे चेअरमन. तिकडे जावे म्हणतो."

" मग तुम्हाला काही अडचण आहे का ?"

" तुमच्यासारखे लोक तेथे गप्पा मारण्यासाठी भेटणार नाहीत. मग वेळ कसा खायला उठेल !"

" तुमचे गाव चांगले आहे का हो ?"

" अगदी गर्द झाडीत वसलेले. गावाजवळून नदी. नदीच्या डोहात यथेच्छ डुंबणं.. " तो आपल्या गावच्या स्वप्नात रमतो. "...तो पाणवठा. पाणवठ्यावर मुली. होय मुलीत मिस पर्वते तुम्ही माझ्याशी भांडताहात..."

ती आता गालात यथेच्छ हसते आहे. खूप हसत आहे तोंडाला हातरुमाल दाबून सारे हास्य ओठात साठवते.

" मी तुमच्याबरोबर येण्याचे ठरवले तर..." तिला रहावत नाही. ती बोलून दाखवते.

" खरेच...मी मिस् पर्वते तुम्हाला घेऊनच जाईन " तो तिच्या डोळ्यात खोल पहात म्हणतो. वाऱ्यामुळे तिचे केस भुरभुरतात. त्याच्या चेहऱ्यावर हळुवार स्पर्शतात.

" तुमच्या संशोधनातील एखादा किस्सा सांगाना !" तो विषयांतर करण्यासाठी बोलणे काढतो.

" हो सांगते ना. कितीतरी गमतीजमती समाज शास्त्रज्ञांना पहायला, ऐकायला मिळतात. परवाच ही गोष्ट मी समाजशास्त्रावरील लेखन करणाऱ्या एका मासिकात वाचली. आसामच्या गारो खाशा टेकड्यात राहणाऱ्या वन्य जमातीचे


संशोधन करण्यासाठी संशोधक गेले होते. त्यावेळी त्यांना हा प्रत्यक्षच ा ा ा आला. एका युवतीच्या लग्नाचा हा प्रसंग !"

"संशोधक तेथे गेले तेव्हा त्यांना मोठाच समूह जमलेला दिसला. वाद्यांचा गजर चालला होता आणि नृत्याची तयारी सुरू होती. अगदी स्वयंवराचीच तयारी! एवढ्यात एक थोराड बांध्याचा युवक तेथे गर्जतच आला. बहुधा मद्य प्यालेला. त्याने सरळ त्या युवतीला उचलून आपले खांद्यावर घेतले. आणि नृत्याच्या तालावर तो नाचू लागला. जणू तो कोणाच्या तरी आव्हानाची प्रतिक्षा करीत असावा. तेवढ्यात दुसरा आडदांड तरुण मोठ्याने ओरडत, नाचत तेथे आला. पहिल्याने युवतीला बाजूला ठेवले. दोघात तुंबळ द्वंद्व झाले. दोघेही बेशुद्ध होऊन कोसळले. स्वयंवर एवढ्यावरच थांबले."

"काय रानटी जमात! विवाह काय त्या प्रसंगीं द्वंद्व काय!" त्याला चर्चेची इच्छा अनावर होते.

"अहो एकेकाचे रीतीरिवाज! दुसरे काय?"

दोघे आता मोठ्या खडकांवर विसावतात. दूरचे डोंगर, डोंगराचा धूसर होत जाणारा रंग. त्याला टेकलेले आकाश. आकाशातील विविध रंगछटा. त्यांच्यातून भराऱ्या मारणारे पक्षी, त्यांचे डोळे सारे निरखतात. बघता बघता ती आपला ठाकठिकपणा विसरते. त्यालाही लाल गुलाबी रंगाची छाटा आकर्षित करते. तिच्या पातळाचा गुलाबी रंग त्याच्या लक्षात येतो. ब्लाऊजचा रंग तो चोरट्या नजरेने पाहून घेतो. कसलातरी मॅच येतो. तो तिचा चेहरा न्याहाळतो. तिची नजर त्याच्याकडे वळते. लाजेने तिची मान खाली वळते. दिवेलागण होते. अंधाराची चादर पृथ्वीवर पडते. हातात हात घेऊन दोघे चालतात. अगदी मुक्याने!



# दोन अध्यक्षांबरोबर

## मेजर-चमनलाल दत्ता

पुस्तक परिचय : दादूमिया

गोरा, उंच, तरुण, सस्मित व नेहमी कडक लष्करी शिस्तीने चालणारा. पण ओळखीमुळे तुमच्याशी सलगीने बोलणारा.

ह्या प्राणी एका पाठोपाठ दुसरे दालन ओलांडीत तुमच्याबरोबर बोलत बोलत चालला आहे. तुम्ही लिफ्टमधून त्याच्याबरोबर एक मजला वर जाता–तो वळतो, गंभीर होतो, बुटाचे खाड् खाड् पाय वाजवीत 'अटेन्शन'ची सलामी देतो.

तुम्हास आश्चर्य वाटते की या प्राण्यास एकदम काय झाले ?

तो कमरेतून थोडासा वाकतो व अभिवादन करतो, जास्तच गंभीर होत म्हणतो, "द प्रेसिडेंट ऑफ इंडिया इज् प्लीज्ड् टु सी यु"–

असे म्हणून शेजारचे दार उघडतो.

तुम्ही आत जाता.

प्रेसिडेंट ऑफ इंडिया तेथे एका कोचावर बसलेले असतात !

सुरवातीला या सुहास्यवदन तरुणाची मला मोठी गंमत वाटे. पुष्कळ वेळा हाच प्रकार पुन्हा पुन्हा घडत गेल्यामुळे त्यातील मजा निघून गेली. मात्र त्या 'स्मार्ट' तरुण ए. डी. सी.विषयक माझे कुतूहल अजून तसेच कायम आहे.

राष्ट्रपती भुवनात काय खलबते चालतात याची या प्राण्यास खडान्खडा माहिती असते. राष्ट्रपती भारतात भारत सरकारचे सर्वोच्च अधिकारी. त्यांच्या वर कोणी

नाही. या जुन्या इंग्रजी धर्तीच्या बिल्डिंगमध्ये जे काय शिजते त्याचा वास रोजच्या रोज घेण्याची संधी आपल्याला मिळाली तर काय बहार येईल असा मत्सरी विचार मी त्या एडीसी नामक प्राण्यास जेव्हा जेव्हा पाही तेव्हा तेव्हा माझ्या डोक्यात येई. कारण राजकीय लिखाण करण्यास काय सुंदर 'मटीरियल' हाती येईल असा स्वार्थी हेतू माझ्या डोक्यात असे.

मला ठाऊक होते हे आपल्याला शक्य नाही. मलाच नव्हे, इतरांनाही.

कारण बोलता बोलता एडीसी नामक त्या प्राण्याने मला एकदा सांगून टाकले होते की लेखनाची व भाषणाची आवड हे त्या एडीसीचे डीसक्वालिफिकेशन ठरते राष्ट्रपतीभुवनात!

आणि अशा या प्रेसिडेंट ऑफ इंडियाच्या एडीसीचा ग्रंथ माझ्या हाती परवा पडला. मी ओळखले, याचा 'बोलविता धनी' कोणीतरी दुसरा आहे.

राजकारणात हे काही और प्रकरण आहे.

एक घटना घडते.

प्रत्येक पुढारी तीस आपापल्या पक्षीय नजरेने न्याहाळतो. 'माझा यात फायदा काय?' हा त्याचा मुख्य प्रश्न.

ती घटना तरी सरळ घडते का?

कोणीतरी चूक करतो व ती घटना घडते. मग ती चुकीची जबाबदारी कोणाच्या माथ्यावर थापायची, त्याची गुप्त चर्चा होते, खलबते होतात. 'मला सोडून दुसऱ्यास जबाबदार धरा,' याची स्पर्धा सुरू होते. कोणीतरी जिंकतो, कोणीतरी हरतो. कोणाचा तरी बकरा बनविला जातो.

किंवा एखादी घटना मुद्दाम बनविली जाते. हेतू एक असतो. बाहेर तत्त्वज्ञान निराळे दाखविले वा बोलले जाते. फक्त पाच सात जाणकार माणसांना आतली मख्खी कळलेली असते. पण ही असतात सरकारची माणसे! त्यांना तोंड उघडण्याची बंदी असते. म्हणून ते अगदी चूप्प बसतात. आणि इतर जाणकार व पेपरवाले शिरा ताणून त्यावर चर्चा करतात, परिसंवाद घडवून आणतात, मोर्चे काढतात. ही जाणकार माणसे मनातल्या मनात हसतात, काय मूर्ख दुनिया आहे म्हणून!

उदा. सालीयाना प्रश्नावरची कंटाळा आणणारी रोज पेपरात दिसणारी चर्चा.

साऱ्या महाराजांचा सारा सालीयाना मिळविला तर तो पाच कोटींपेक्षा जास्त नाही. त्यामानाने या मंत्र्यांचा अखिल भारतीय पातळीवर सालीयाना विचारात घेतला तर पन्नास कोटींच्या वर जातो. हे अर्थशास्त्रीय तज्ज्ञांना कळते, पेपरवाल्यांना कळते, रामू व गणूला कळते—

आणि इंदिरेस कळत नाही असे का तुम्हास म्हणावयाचे आहे?

पण इंदिरेचे स्पष्टीकरण किती सरळ सोपे आहे?

' सालीयाना म्हणजे काय ? सरकारी पैसा. अरे, माझा पैसा घेऊन माझ्याविरुद्ध काम करता काय ? कॉंग्रेस (ओ) व स्वतंत्र पक्षास मदत करता काय ? थांबा, तुमची रसदच अडवून धरते. बघू या, लढाई कशी जिंकता ते–'

हे स्पष्टीकरण एकदा समजले की पुढच्या गोष्टी किती सोप्या वाटतात?

पण पेपर वाचून या गोष्टी कशा कळणार ?

म्हणून वर सांगितलेल्या ' वुईथ टू प्रेसिडेंटस् ' या ग्रंथाचे महत्त्व.

राजकीय ग्रंथ दोन जातीचे असतात. एक अभ्यासू लोक माहिती गोळा करून तिचे संकलन करून, ती आपल्या पक्षीय भट्टीत घालून जो ग्रंथ निर्माण करतात तो. दुसरा ग्रंथ अनुभवी पुढारी लोक स्वतःचे अनुभव सांगून रहस्यभेद ज्या योगे करतात तो. दुसऱ्या जातीचे ग्रंथ नेहमीच जास्त लोकप्रिय व खमंग ठरतात. पहिल्या प्रकारचे ग्रंथ पक्षीय कचेरीच्या स्टोअरवेलमध्ये सुरक्षित रहातात. त्यांचा अभ्यास प्राध्यापक मंडळी करतात. मला राजकीय ओळी वाचण्यापेक्षा त्या ओळींच्या मध्ये काय आहे किंवा ओळींच्या मागे काय आहे हे पाहण्याचा छंद लागल्यामुळे मेजर सी. एल्. दत्ता यांचा हा ग्रंथ मला पर्वणीच वाटला.

नेहरूचाचांचे पर्व संपले. त्यांचे विरोधी पुढारी, मरायच्या आत त्यांना ठाऊक असलेली रहस्ये जगास सांगावयास उत्सुक झाले आहेत. कारण रहस्यभेद करण्यात पहिला कोण यालाच महत्त्व असते. बाकीच्यांना काही नाही. आणि अशा बऱ्याच आतल्या गोटातील गोष्टी सांगून मेजर सी. एल. दत्ता यांनी हा ग्रंथ मोठा चटकदार वाचनीय व मनोरंजक केला आहे.

## गोवा ॲक्शन आणि मेनन निवडणूक

उदा. ' गोवा ॲक्शन ' साऱ्या जगास आधी माहित झाली होती. त्याची सारी लष्करी रहस्ये पोर्तुगीज फिरंग्यांच्या हाती लागली होती. पाश्चिमात्य राजकीय पुढाऱ्यांना त्याचे ज्ञान झाले होते. फक्त त्यावेळची ही हकीगत राष्ट्रपतींनाच तेवढी माहीत नव्हती ! राष्ट्रपतींची सही प्रत्येक हुकुमावर कायद्याने लागते. म्हणून तेवढी माहिती त्यांना नंतर सांगितली गेली, नाहीतर तीही माहिती त्यांना सांगण्याचे कारण नव्हते. त्याउलट ' ऑपरेशन व्हिक्टरी ' ही गोव्याची योजना अमलात येण्यापूर्वी तिची एक प्रत पोर्तुगीज राजकारणी लोकांच्या हाती मिळालेली होती !

गोवा पडले.

आमचे राष्ट्रपती एकदम खूष झाले ! राजेंद्रप्रसादांच्या कुटुंबातील माणसेदेखील हरखून गेली. मात्र त्यांच्या तैनातीस असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांना त्या विजयाचे काहीच कौतुक वाटेना ! गोव्यावर गाजविलेला तर काय विजय होता ? फिरंगी तर हल्ला व्हायच्या आधीच पळून गेले होते ! गोव्यात फिरंग्यांचा जोर असा नव्हताच. त्यांच्याजवळ पुरी सेनादेखील नव्हती. त्यांची लष्करी तयारी फक्त एकच

होती-वेळ आली तर पंजीम ही राजधानी व भारतीय सरहद्द यांना जोडणारा पूल उडवून द्यायचा.

लक्ष्मण यांनी टाइम्समध्ये त्यावेळी फार उत्तम व्यंगचित्र दिले होते.

सारे भारतीय पेपर वाचणारे लोक राष्ट्रपतींप्रमाणेच खूष होते.

जाणकार जाणून होते की हा सारा 'ऑपरेशन विजय' मेननच्या मुंबईतील निवडणुकांसाठी पूर्वतयारी होती !

आणि पाश्चिमात्य राजकारणी खूष होते की नेहरूंची जिरवायला कशी नामी संधी आयती चालून आली आहे !

कसली कपाळाची विश्वशांतीची नेहरूंची कळकळ ? 'गोवा ॲक्शन' मुळे नेहरूंची प्रतिमा ढासळली. हे भारतीय कबूतर आपल्या सरहद्दीचे प्रश्न सोडविण्यासाठी युद्धाशिवाय दुसरे काहीच बोलत नाही. काश्मीर, हैदराबाद, जुनागढ व आता गोवा ! यूनोपासून देशोदेशीच्या लोकसभातून नेहरूंच्या या युद्धखोर वृत्तीवर सडकून टीका होऊ लागली. आणि हे कबूतर इंग्लंड–अमेरिका–रशिया यांना फॉर्मोसात, कोरीयात, काँगोत सर्वत्र शांततामय चर्चेचा उपदेश देत असते ! अरे, चीनबरोबरसुद्धा युद्धाशिवाय नेहरू आपला प्रश्न सोडवून येणार नाहीत असें त्यावेळीही बोलले जात होते. गोव्यावर एकाएकी हल्ला चढविण्याची अशी कोणची कटोकटीची समस्या भारतासमोर उभी राहिली हे पाश्चिमात्यांना मोठे कोडे पडले होते !

राजेंद्रप्रसाद !

भारताचे पहिले राष्ट्रपती.

कोठे नेहरू व कोठे हे बाबूजी ?

दमेकरी, कमजोर व अशक्त प्रकृतीचे हे राष्टपती ! त्यांना कोणास रागेही भरता येत नसे, वादावादी वा झगडा बाजूलाच राहिला असे मे. दत्ताजींनी लिहून ठेवले आहे. ऑल इंडिया रेडियो या राष्ट्रपतींची भाषणे कापून टाकी. तरीदेखील या बाबूजींनी त्याविरुद्ध एक चकार अक्षर काढले नाही !

खरं म्हणजे नेहरूंना राजेंद्रप्रसाद मनातून नकोच होते. त्यांना पहिल्या राष्ट्रपतींचा मान सी. राजगोपालाचारीअर या चाणक्य पुरुषास द्यावयाचा होता. ते गव्हर्नर जनरल आधी होतेच. त्यांना राष्ट्रपतींच्या कामाची त्यामुळे आधी माहिती होतीच. तेही दमेकरी व अशक्त होते. पण राजेंद्रबाबू व चक्रवर्ती राजगोपालाचारीअर यांच्यात मोठा फरक होता. ते जास्त हुषार होते.

मात्र नेहरू सोडून सी. आर. यांना कोणाचाच पाठिंबा नव्हता. उलट राजेंद्रप्रसाद आपल्या मऊ स्वभावामुळे सर्वांना प्रिय होते. त्यांनी कोणास कधी दुखावलेच नाही तर ते अप्रिय होणार कोठून ?

१९३५ मध्ये पं. नेहरूंनी आपली आत्मकथा लिहिली त्या साऱ्या कथेत डॉ. राजेंद्रबाबूंचे नाव फक्त एकदाच आले आहे व तेही तळटीपेत हे सांगितले तर

आश्चर्य वाटेल. पण त्यावरून नेहरू-राजेंद्रबाबू संबंध कसे होते यावर चांगला प्रकाश पडेल.

राजेंद्रबाबू सरदार पटेल कंपूतले. ते जेव्हा काँग्रेस अध्यक्ष झाले तेव्हा तर काँग्रेसच्या वर्किंग कमिटीत त्यांनी नेहरूंचे नाव घालायला चक्क नकार दिला. नंतर मौ अबुल कलम आझादांनी खूप खटपट करून त्यांचे नाव एकदाचे वर्किंग कमिटीवर ठेवले !

## राष्ट्रपतींना पत्ताच नाही

असे असले तरी नेहरू व राजेंद्रबाबू यांची स्वातंत्र्योत्तर उघड भांडणे कधीच झाली नाहीत. एकमेकांविषयी त्यांना प्रेम नसले तरी आदरभाव होता ! मात्र एका प्रमुखाने दुसऱ्या प्रमुखाचा मान राखायचा असतो हे पंडित नेहरू पुष्कळ वेळा विसरून जात. नेहरू राष्ट्रपतींना भेटण्यास जात त्यावेळी नेहमी उशीरा जात ! राजेंद्रबाबू बिचारे ताटकळत बसून राहत. परदेशी पाहुणा आला असला तरी हीच गोष्ट. सत्कार समारंभाच्या किंवा भोजनाच्या वेळी नेहरू हटकून उशीरा येत. राष्ट्रपती भुवनात त्यामुळे तेथील अधिकारी आपापसात कुजबुजत, 'राजेंद्रबाबू नामके वासते राष्ट्पती है। असली राजा तो पंडितजीही है ।'

मग राष्ट्रपतीजी सारा दिवस काय करीत ? कारण हे तर उघड आहे की नेहरूंनी त्यांचा सल्ला निदान राजकारणात तरी कधी घेतला नाही.

राजेंद्रबाबू एक साधू पुरुष होते. ते उपास करीत. इतर साधू-संतांना बोलावून घेत व सत् संगाचा आनंद उपभोगीत. निरनिराळ्या भजन मंडळींना ते बोलावून घेत व त्यांची भजने तासन्तास ऐकीत बसत. त्यांचे बोलणे, त्यांचे चालणे सारे नम्र असे.

मात्र वाचन व मनन या बाबतीत राजेंद्रबाबू अजब होते. ते 'एकपाठी' होते. एक पान वाचले तर ते तसेच्या तसे म्हणून दाखवीत ! राष्ट्रपतींच्या सहीसाठी देहांत शासन झालेल्यांचे बरेच अर्ज येत. त्यावर डोळे बंद करून ते सही करीत नसत. त्यांचा अभ्यास हाच त्यांचा पास् टाईम ! !

सकाळी उठल्यावर राजेंद्रबाबूंची सूतकताई सुरू होई. ती शेवटपर्यंत त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रपतीभवनात एक लहानसे पण सुंदर मंदिर बनवून घेऊन राजेंद्रबाबू तेथे पूजा करीत बसत. ज्योतिषावर त्यांचा भलताच विश्वास होता. ह्या त्यांच्या श्रद्धेचा फायदा इतर लोक व मित्रमंडळी घेत. ते त्यांना सांगत, 'ज्योतिष असे सांगते की तुम्ही राष्ट्रपती आहात तोवरच मरणार – निवृत्त झाल्यावर नाही.'

गांधीवादाचा 'खुल्लंखुलेपणा' हा शाप आपल्या राजकारणास फारच नडलेला आहे. आपली लष्करी गुपिते सुरक्षित न ठेवण्याचा मक्ता जणू संरक्षणखात्याने घेतला आहे ! आपली सारी लष्करी गुपिते परदेशांकडे ताबडतोब रवाना होत

असतात. १९६१ ची पोलीस कारवाई करण्याचे 'लष्करी गुपित' होते पण पोर्तुगीजांना १५ डिसेंबर रोजी हल्ला करण्याचा निर्णय घेतला तोही केव्हाच कळला होता ! फक्त दोन तासाच्या अवधीतच ! !

या सर्व प्रकाराचा रहस्यभेद दत्ताजींनी आपल्या ग्रंथात फार छान केलेला आहे. 'थंडीत हवा छान होती. एका बाजूस आमच्याकडे राष्ट्रपतीभवनात एका पाठोपाठ दुसरे परदेशीय पाहुणे गर्दी करीत होते व दुसऱ्या बाजूस आमची गोव्यावर लष्करी हल्ला करण्याची तयारी चाललेली होती. राजधानीतील लष्करी प्रमुखाने गोवा मुक्तीची संपूर्ण योजना तयार केली. बेळगावशेजारी दक्षिण कमांड सज्ज राखण्यात आले होते. पण दक्षिण कमांडला सोडण्यात येणारे सारे हुकूम जगभर प्रसारित होत असत ! ! त्यामुळे साऱ्या महत्वाच्या परदेशीय अध्यक्ष वा प्रधान मंत्र्यांच्या नेहरूंकडे गोव्यासंबंधी सारख्या विचारणा होऊ लागल्या. सारे नेहरूंना 'गोव्यापासून दूर रहा' असा साळसूद उपदेश करू लागले. दोनच महिने आधी पोर्तुगालचा सालाझार व अमेरिकेचे जॉन फॉस्टर डल्लेस यांनी संयुक्त पत्रक काढले होते की गोवा हा पोर्तुगालचाच एक भाग आहे !'

'भारत सरकारची गोव्यावरील हल्ल्याची तयारी आम्ही राष्ट्रपती भुवनातून पाहून हसत होतो. लष्करास जाण्यासाठी खास आगगाड्या सोडण्यात येत होत्या ! असे वाटत होते की जणू गोवाच भारतावर आक्रमण करणार आहे व त्याची तयारी चालली आहे. नंतर कळलें की ही तयारी करणारे आमचे कौल साहेब आहेत ! गोव्यात फिरंग्यांची जेमतेम एक ब्रिगेड ताकद होती. पाकिस्तानच्या हाय कमिशनरच्या लष्करी ॲटॅचीने – कर्नल इक्बालने – मजेने एका एडीसीस पृच्छा केली, "अजून तू कसा गोव्यास गेला नाहीस ?" कारण दिल्लीत अशी एक वार्ता प्रसृत करण्यात आली होती की भारत गोव्यावर स्वारी करेल त्यावेळी पाकिस्तान भारतावर आक्रमण करणार आहे. या वार्तेने राजधानीत घबराट निर्माण झाला होती.'

'आम्हास कळले की १५ डिसेंबरऐवजी १८ डिसेंबर ही तारीख पसंत करण्यात आली आहे. १५ डिसेंबर रोजी स्वारी न झाल्यामुळे परदेशीय सत्ताधीशांना अचंबा वाटू लागला की असे कसे झाले ? पंजीमचा फिरंगी गव्हर्नर-जनरलदेखील १५ तारीख ही स्वारीची तारीख धरून बसला होता ! १५–१६ या दोन्ही दिवशी ऑल इंडिया रेडियोवर गोव्याविषयी एकही बातमी दिली गेली नाही. मात्र १७ डिसेंबर रोजी एवढेच सांगण्यात आले की, नेहरूंनी अमेरिकन प्रेसिडेंट आयसेनहॉवर यांना पुढील मजकूर कळविला आहे: भारताच्या अंतर्गत व्यवहारात गोव्याचे पोर्तुगीज सरकार फारच नाक खुपसू लागले आहे. गोव्याचे भारतीयांवरील अत्याचार आता असह्य होत चालले आहेत.'

कोणच्याही क्षणी भारतीय सेना गोव्यात शिरणार अशी बातमी आल्यामुळे

राष्ट्रपतीभवनाची सारी हवा तापू लागली. अर्थात नक्की कोणालाच काही माहीत नव्हते. राष्ट्रपती म्हणजे सैन्याचा सर्वोच्च सरकारी प्रमुख. पण त्यांनाही यातली काही माहिती नव्हती! रात्रौ ११ वाजून १० मिनिटांनी नेहरू राष्ट्रपतींना भेटावयास आले. याचा अर्थ कारवाई सुरू केल्यावर दोन तासांनी नेहरूंनी राष्ट्रपतींना ती बातमी सांगितली.

ही तर नेहरूंच्या खाती राष्ट्रपतींची किंमत होती!

गोव्याच्या या अनुभवानंतर मेजर दत्ता यांना चीनच्या आक्रमणाच्या वेळी भारतीय सरकारच्या तयारीचा मासलेवाईक अनुभव चाखण्यास मिळाला. त्याची विस्तृत नोंद त्यांनी तारीखवार ठेवलेली आपणास पहावयास सापडते. आक्रमणाच्या दोन दिवस नंतरची नोंद आपले लक्ष ताबडतोब खेचून घेते. २३ ऑक्टोबर रोजी जन. थापर यांनी सर्व राज्यांचे राज्यपाल, सरकारी मंत्री व अन्य अधिकारी यांना राष्ट्रपतीभुवनातील कॅबिनेट रूममध्ये एकत्र करून परिस्थितीची यथार्थ जाण दिली. लष्करी नकाशे आणण्यात आले. १९ तारखेस ७ व्या ब्रिगेडचा धुव्वा कसा उडाला हे थापरांनी सर्वांना समजाविले. त्यांनी उभे केलेले सारे चित्र मोठे निराशाजनक होते!

त्यांना गुजराथच्या गव्हर्नर मेंढी नवाझ जंग यांनी विचारले, "पण अशी आपली दयनीय स्थिती का व्हावी?"

थापर म्हणाले, "लष्कराने सरकारला वारंवार चीनच्या सरहद्दीवरील वाढत्या भयासंबंधी सूचना केल्या होत्या. चीनचे वाढते लष्करी बळ व आपल्या तयारीच्या अभावाचे चित्रही सरकारला लष्करी तज्ञांनी धाडले होते. लष्कराने पायदळासाठी ७.६२ बोअरच्या रायफलीची मागणी केली होती. एअरफायटर कॅरिअरसाठी भारताने ४० कोटी रुपये खर्च केले होते. लष्करास या धोरणाविषयी मुळातूनच शंका होती! लष्करी ट्रक्सचा सारा काफला १८ कोटी रुपयात जेथे ओव्हरऑल होऊ शकत होता तेथे ४० कोटी रुपयांच्या इतर खर्चाची जरूर काय?"

नेहरूंनी जन. थापर यांच्याकडे बघितले. त्यांची नजर स्थिर नव्हती. डोळे जड झाल्यासारखे दिसत होते.

एवढ्यात मेनन उभे राहिले. आपल्या घोगऱ्या आवाजत त्यांनी सांगितले, "आम्हास शस्त्रे भारतात बनवायची इच्छा आहे. उदाहरणार्थ, आमची मॉर्टर्स बनविण्याची सारी खटपट निष्फळ गेली, याचे कारण अर्थखात्याने आम्हास परकी चलन मंजूर केले नाही."

मोरारजी देसाई हे ऐकून गरम झाले व म्हणाले, "भारतीय संरक्षण संकटात आहे हे पाहून तरी आपणास मला भेटण्याची इच्छा व्हावयास पाहिजे होती. गेल्या पाच वर्षात मी तुम्हास ४० कोटी रुपये मंजूर केले होते. पण त्यांतील एक पैही आपण खर्च केली नाही. बजेट पहा, त्यात ही रक्कम अजून शिलकीतच आढळेल!"

मोरारजी खूपच संतापले होते. ते खिडकीपाशी गेले, त्यांनी 'राष्ट्रद्रोही' अशी शिवी मेननना हासडली.

वातावरण तंग झाले.

'वास्तव दृष्टी ठेवा, विवेक धरा,' अशी विनंती नेहरूंनी सर्वांना केली व शांतता प्रस्थापित करण्याची कोशिश केली.

'पण आता आपण करावे काय?' दोन राजपालांनी एकदम उठून पृच्छा केली.

'काहीही करून आपण शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे,' थापर म्हणाले, 'चीनसमोर आपण लढा तर देऊ शकणार नाही. चिनी सैन्य तेजपूर घेणार असे दिसते. ते कलकत्तासुद्धा घेऊ शकतील! आपण बचावाची तयारी केली पाहिजे, आपली लष्कराची ताकद आपण दुपटीने वाढविली पाहिजे, त्यासाठी ३ ते ४ वर्षांची तयारी पाहिजे! आणि पाच अब्ज रुपये!!'

ही महत्त्वपूर्ण बैठक कटुता व गरम गरम माथी यांच्यातच एकदाची संपली.

जन. थिम्मैया संरक्षण वर्तुळाचे एक सल्लागार व सभासद होते. राष्ट्रपतींना भेटण्यासाठी ते मागे थांबले होते. नेहरू मान खाली घालून परत घरी चालले होते. त्यांच्याकडे पहात थिमैय्या मला म्हणाले, 'एके काळचा हा सदैव तरुण राहणारा प्रधान मंत्री आता पहा कसा म्हातारा दिसू लागला!'

## भारताने लाहोर का घेतले नाही?

१९६५ च्या पाकिस्तानी युद्धावेळची मेजर दत्ता यांची डायरी तेवढीच चटकदार आहे. त्यावेळी दत्ता राष्ट्रपतींचे एडीसी नव्हते. ते निवृत्त झाले होते. उत्सुकता म्हणून राष्ट्रपतींना ते पुणे येथे भेटले. राष्ट्रपतींनी भारत पाकिस्तान युद्धातील मुख्य घटनांची दत्तांबरोबर चर्चा केली. पुण्याच्या बैठकीत डॉ. राधाकृष्णन यांनी दत्तांना विचारले, 'मेजर दत्ता भारताने लाहोर का घेतले नाही?'

'साहेब, ते आपण मला तुम्ही सांगितले पाहिजे.'

राष्ट्रपती हसले व स्मित करून म्हणाले, 'सारे मला खोटे सांगतात. कोणी खरे सांगत नाही.'

'म्हणजे?'

'मी एअर मार्शल अर्जुनसिंगास विचारले की दिल्लीवर पाकिस्तानी पॅराशूट्स्च्या सहाय्याने उतरत आहेत हे खरे का? १७ सप्टेंबर रोजी विमाने खलास केली हे खरे का? अर्जुनसिंगाने खांदे हलविले व ते म्हणाले, ती दिशाभूल करण्याची एक युक्ती होती.'

'अस्सं.'

'मी इथिओपियाहून परत येत असता इजिप्तच्या नासरने मला विचारले, तुम्ही लाहोर का घेतले नाही? आम्हीं त्या बातमीची किती वाट पहात होतो?'

'हं–'

'तुम्हास माहीत आहेच, राधाकृष्णननी तोंडात काजू टाकीत मला सांगितले,' 'सत्य लपवून ठेवणे मला पसंत नाही. माझी नासरला असे खोटे सांगण्याची हिंमत झाली नाही की इछोगील कॅनॉलवर पाकिस्तानी लोक वाघाप्रमाणे लढले!'

## परराष्ट्रनीतीची चिकित्सा

राष्ट्रपती भारत-पाक युद्धाबरोबरच परराष्ट्रनीतीचीही चिकित्सा करू लागले. ती सारांश रूपाने पुढीलप्रमाणे:

१५ वर्षांपूर्वी आपण स्वतंत्र झालो. त्यावेळी प्रत्येक राष्ट्राने मैत्रीसाठी आपला हात पुढे केला होता. तीन मुख्य देश—अमेरिका, रशिया व चीन—व जपान आणि जर्मनी यांच्याबरोबर आपले संबंध सध्या कसे आहेत? आपण व्हिएटनाम युद्धावर टीका करतो. आपण लक्षात ठेवले पाहिजे की ते लोक आपलीच युद्धे तेथे लढून राहिले आहेत. भारत अमेरिका संबंध अमेरिकेच्या औदार्यावर अवलंबून आहेत. रशियाबरोबर आपले संबंध फार छान आहेत पण काश्मीरच्या बाबतीत रशियाचा पूर्वीचा पाठिंबा आता हळूहळू अदृश्य होत चालला आहे. चिनी आक्रमणाच्या वेळी रशियाने आपणास फक्त तोंडदेखली सहानुभूती दाखविली. चीनशी तर आपले संबंध पार बिघडले आहेत. नाथू लांत चीन एक बाँबगोळा टाकते व आमचे अर्थशास्त्र इथे बंद पडते! जर्मनी, जपान व ब्रिटन यांच्याशी संबंध संपूर्णपणे सौदाबाजीचे आहेत. जरुरीच्या वेळी ब्रिटनवर विसंबता येणे शक्य नाही. जर्मनी व फ्रान्सचे उदाहरण घ्या ना. आमच्या औद्योगिक क्षेत्रात भांडवल गुंतविण्यास हे लोक किती काचकूच करतात!

आशिया व आफ्रिका यातील देशांबरोबर आपण एकतेच्या गोष्टी करतो. पण त्या गोष्टीदेखील एकपक्षी असतात. आपल्या मैत्रीस साथ दादही कोणी देत नाही या देशांपैकी! मलाया सोडले तर १९६२ साली आपल्यास मदत कोणी केली?

मेजर दत्तांनी सर्व सामान्य वाचकांस या चटकदार गोष्टी सांगून या देशात खरे देशभक्त कोण व खरे देशद्रोही कोण या प्रश्नावर छान प्रकाश पाडला आहे.

सुरवातीलाच प्रस्तावनेत त्यांनी सांगून टाकले आहे, "या पुस्तकात काही सनसनाटी रहस्यभेद नाहीत. कपाटातून हाडांचे सापळे बाहेर काढून ते वाचकांसमोर नाचविले नाहीत, कोणी चांगल्या प्रतिष्ठित पुढाऱ्यांवर केलेली चिखलफेक नाही किंवा आघातजनक कलंककथा देखील नाहीत."

"मी इतिहासकार नाही. घडलेल्या घटना वा घडविणाऱ्या व्यक्ती त्यांचा न्यायाधीश व्हायचीही माझी इच्छा नाही."

मग मेजर दत्तांनी हा ग्रंथलेखनाचा आटापिटा केला कशाला?

"मनोरंजन करणे हा माझा पहिला हेतू होय. त्याचप्रमाणे देशी व विदेशी पुढाऱ्यांची मानवी बाजू दाखविण्यासाठी वाचकांना पडद्यामागे नेण्याचा माझा हेतू आहे. वर उंचावर बसलेले पुढारी देखील शेवटी माणसेच आहेत— त्याच हाडा-

मासाची– हे मला वाचकांना दाखवायचे आहे."

मेजर दत्ता राष्ट्रपतींच्या सान्निध्यात होते त्यामुळे पडद्यामागे काय चालते हे त्यांना खुद्द अनुभवावयास मिळाले. त्यांनी कबूल केले आहे की, एडीसी हा राष्ट्रपतींचा विश्वासू सेवक नसतो तर त्यांच्या कुटुंबाचा एक भाग होऊन बसतो.

पण ह्या लोकांना ही सारी माहिती प्रकट करण्यास सरकारने परवानगी कशी दिली त्याचे मला आश्चर्य वाटते.

कालपरवा डॉ. राधाकृष्णन् यांनी या पुस्तकातील काही गोष्टींचा इन्कार केला आहे. मला स्वत:ला ह्या इन्कारात राम वाटत नाही. शास्त्रीजींच्या काळात डॉ. राधाकृष्णन् नेहरुविरोधी विधाने सरळ सरळ करीत.

मला स्वत:लाच त्याचा अनुभव आला होता. फरगेट नेहरू हे डॉ. राधाकृष्णन् यांचे शब्द मी अजून विसरू शकत नाही.

आता नेहरूंच्या सुकन्येच्या राज्यात हे गृहस्थ आता मी असे बोललोच नाही असे जरी म्हणाले तरी त्यावर जाणत्यांचा विश्वास बसावा कसा ?

मेजर दत्तांच्या म्हणण्याप्रमाणे कामराज योजना जवाहरलाल नेहरुंना दूर करण्यासाठीच घडवून आणली गेली. सत्तेस लालसावलेल्या मंत्र्यांना लोकात काम करण्यास धाडण्यासाठी नाही !

कामराज योजना कामराज व डॉ. राधाकृष्णन् या दोघांनी, चिनी आक्रमणाच्या वेळी भारताच्या नामुष्कीस जबाबदार ठरलेल्या जवाहरलाल नेहरुंना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी आखली होती, यावर तुमचा विश्वास बसेल काय ?

१९६३ जुलैची गोष्ट. चिनी आक्रमणाच्या वेळी भारताची जी बेअब्रू झाली त्यास जबाबदार नेहरू व इतर मंत्री होते. ह्या लोकांनी जनतेत जाऊन जनतेचा


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही हरेकजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

गमावलेला विश्वास पुन्हा परत मिळवावा त्यासाठी ही कामराज योजना घडली. काँग्रेसनेत्यांसमोर ही योजना ठेवण्यात आली. त्याआधी ही योजना हैदराबादेतील राष्ट्रपती निळयमात राष्ट्रपती व कामराज यांच्या प्रदीर्घ चर्चेतून जन्मली. तेथील हिरव्या लॉनवर खूप उशीरा रात्री या दोघांनी या योजनेचा विचार केला.

## कामराज योजना उलटली

म्हणून दक्षिणेतील आपला मुक्काम तसाच अर्धवट टाकून राष्ट्रपती राजधानीत परतले. नेहरूंच्या निवासस्थानी या योजनेची काँग्रेस नेत्यांच्या हजेरीत चर्चा होणार होती. ही बैठक थेट मध्यरात्रीपर्यंत चालली. त्यावेळी राष्ट्रपती भुवनातील समाखड व शयनखंड येथे राधाकृष्णन् अस्वस्थपणे फेऱ्या मारीत होते! नेहरु 'रिटायर' होणार या बातमीची ते वाट पहात होते! मात्र वर्किंग कमिटीचा निर्णय ऐकल्यावर त्यांना धक्काच बसला! कारण कामराज योजनेचा बाण नेमक्या निशाणास लागलाच नाही! नेहरूंना तो डाव आधीच कळला होता! त्यांनी ते हत्यार आपल्याला अप्रिय असणाऱ्या मंत्र्यावर नेमके उलटविले. त्यांना दूर करण्यासाठी हिकमतीने नेहरूंनी कामराज योजनेचा वापर केला. डॉ. श्रीमाळी, बी. गोपाळ रेड्डी व लालबहादूर शास्त्री ही तिन्ही राधाकृष्णन यांची माणसे! त्या तिघांनाही नेहरूंनी घरी बसविले.

मला स्वतःला वाटते की, नेहरूंपुढे बोलण्याची कामराजांची हिंमतही झाली नसेल! नेहरूंचे व्यक्तिमत्त्वच तशा जातीचे होते. मोरारजीभाईंची आत्मकथा गुजराथीत लिहून पूर्ण झाली आहे. त्यात या गोष्टीचा उहापोह निश्चित केला असला पाहिजे.

कारण मला मिळालेल्या माहितीवरून कामराज योजनेचे खरे कारण आणखी निराळे आहे! ते "लफडे" खरे होते याची मी मोरारजीभाईंकडून खात्री करून घेतली आहे.

मात्र भारताच्या पराजयाच्या निमित्ताने नेहरुंना 'डिसमिस्' करून जयप्रकाश नारायण यांना सर्व पक्षांच्या मदतीने त्या जागी नेमण्याची राष्ट्रपतींची जी योजना मेजर दत्ताजींनी वर्णन केली आहे ती मला स्वतःला शंकास्पद वाटते. कारण मोरारजींपासून कामराजांपर्यंत जयप्रकाश नारायणांना स्पर्धक खूपच होते. त्या स्पर्धेत तर उलट भारताचे जास्त नुकसान झाले असते.

पुरुषोत्तमदास त्रिकमदास यांच्या घरी या नेत्यांची बैठक झाली होती. तेथे जयप्रकाशजींनी नम्रमणे त्यांना देण्यात आलेली ऑफर नाकारली. त्यावेळी राष्ट्रपतींनी जयप्रकाश नारायणांना आपल्या सलूनमध्ये बोलावले व "तुम्ही तयार रहा" असे सांगितले.

डॉ. राधाकृष्णन् यांना १९६२ सालच्या हिमालयातील युद्धातील आपल्या पराजयामुळे फार वाईट वाटले होते. त्यांचा राग अर्थातच पंडितजींवर होता. पंडित-

जीच या नामुष्कीस जबाबदार आहेत याविषयी त्यांची खात्री झाली होती. या नामुष्कीच्या पापाचे नेहरूंना प्रायश्चित्त मिळाले पाहिजे आणि हे प्रायश्चित म्हणजे ' राजीनामा ' असे राष्ट्रपतींना वाटे

नेहरूंना त्याच्या उलट वाटत असले पाहिजे.

' सत्तेची अभिलाषा ' हे तर त्यांच्या राजीनाम्याच्या नकाराचे एक कारण होतेच. त्याशिवाय नेहरूंना वाटत असले पाहिजे की जर नेहरूंनी राजीनामा दिला तर चीनचा अंतःस्थ हेतू आपोआप सफल होईल.

चीनने भारतावर स्वारी का केली ? प्रामुख्याने भारतीय आर्थिक प्रगतीस चीनला बांध घालावयाचा होता व तो हेतू चीनने अतिशय यशस्वीपणे पार पाडला.

दुसरा चीनचा हेतू नेहरूंचे नेतृत्व नेस्त नाबूद करणे हा होता.

नेहरूंनी आफ्रिका व आशिया या दोन खंडांच्या राजकीय संसारात फार मोठे मानाचे स्थान मिळविले होते. या अर्धविकसित राष्ट्रांमध्ये त्यामुळे चीनला काहीच भाव मिळत नव्हता.

## वक्रतेची चमक

चीनवर नेहरूंनी आंधळा विश्वास टाकला होता याची राष्ट्रपतींना मोठी रुखरुख लागून राहिली होती. नऊ ते एकवीस नोव्हेंबर या दरम्यान राष्ट्रपती भुवनात ज्या बातम्या येत त्या एवढ्या उलट सुलट असत की ऐकणाऱ्याचा गोंधळच व्हावा. राजकीय घटना झपाट्याने रंग बदलीत होत्या. क्रिया कळत पण ' प्रतिक्रिया ' समजत नसत. चीनने भारतीय राजकीय रंगभूमीवर गोंधळ उडवून दिला होता.

चौदा नोव्हेंबरची गोष्ट. पं. नेहरू लोकसभेत निवेदन सादर करीत होते: ' जनरल कौल आपल्या शूर वीरांपैकी एक आहे...भारत स्वतंत्र झाला त्यावेळी आजूबाजूच्या देशांचा आक्रमक इरादा असेल अशी शंकाही आमच्या मनास शिवली नाही. बंदूक का ब्रेड हा प्रश्न आपल्यासमोर उभा होता त्यावेळी. भारत युद्धासाठी म्हणून तयार नव्हते. '

स्वतःच्या शयनगृहात पडल्या पडल्या डॉ. राधाकृष्णन् नेहरूंच्या मायक्रोफोनशी डायरेक्ट जोडलेल्या लाऊडस्पीकरमधून नेहरूंचे भाषण ऐकत होते. साधा कुडता व धोतरच ते नेसले होते. वक्रतेची चमक त्यांच्या डोळ्यात दिसत होती. स्मित करीत ते उद्गारले, ' हा गृहस्थ पहा काय बोलून राहिला आहे ते ! '

राष्ट्रपतीभुवनातील वातावरण तप्तच होते. सायंकाळ झाली होती. मोगल गार्डनमध्ये वृक्षांच्या छाया लांब होत चालल्या. एडीसी व राष्ट्रपती त्या बागेत पाय व मन मोकळे करीत होते.

किती वेळा त्यांनी एकच प्रश्न विचारला, ' लोक नेहरूंविषयी काय म्हणत आहेत ? नेहरूंची प्रतिष्ठा कमी नाही झाली ? लोक सरकार बदलावे असे नाही म्हणत ? '

राष्ट्रपतींचा सुपुत्र डॉ. गोपाळ–तेथे आला.

ते दोघे तेलगू भाषेत काही तरी चर्चा करीत. मला असे भासले की काही निवृत्त सेनापती व राष्ट्रपती यांचे मिळून 'वॉर कौन्सिल' रचले जाऊन नेहरू व मेनन यांना राजीनामा देण्याविषयी सूचना केली जाणार! लोकात जाऊन आपल्या हाताने गमावलेला जनतेचा विश्वास पुन्हा परत मिळवून देण्याची संधी (?) त्यांना राष्ट्रपती देणार असे दिसू लागले.

२८ नोव्हेंबर १९६२ या रोजी जनरल कौल यांना बडतर्फ करण्यात आले.

दहा दिवसांपूर्वीच जनरल थापर व मेनन यांना कमी करण्यात आले होतेच.

२० नोव्हेंबरला बोमडीला पडले.

२१ नोव्हेंबरला नवीन चीफ ऑफ स्टाफ जनरल चौधरी राष्ट्रपतींच्या मुलाखतीला (दर्शनाला ?) आले

आणि इकडे चीनने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली!

तेवढेच नाही तर चिनी सैन्य मागेही हटले.

राष्ट्रपतींची व जनरल चौधरींची मुलाखत संपली. ज. चौधरी हसत हसत बाहेर आले. लिफ्टमध्ये शिरणार एवढ्यात त्यांना कायसे आठवले, खिशात हात घातला व एक कागद काढून मला देत ते म्हणाले, 'मी राष्ट्रपतींना हा कागद देण्यास विसरलो होतो.'

मी तो कागद खिशात ठेवणार तोच ते म्हणाले; 'वाचा ना–'

लिफ्ट खाली उतरत होती.

तेवढ्यात मी तो कागदावरील मजकूर वाचून काढला. जनरल चौधरी यांना फर्मावलेला बडतर्फीचा हुकूम होता तो. त्याखाली जनरल मोतीसागर यांची सही होती. १५ मे १९६३ रोजी जनरल चौधरींची मुदत संपत होती व त्या आधी सहा महिने त्यांना रजा उपभोगून घ्यावयाची असल्यास त्यांनी ती घ्यावी असा आदेश त्यांना लिहिला होता. थोडक्यात, रजा घेऊन जनरल चौधरीसाहेबांनी कामावरून दूर व्हावे असा हुकूम होता तो!' [अपूर्ण]

## पुस्तक परिचय लेखाचा उरलेला भाग पुढील अंकी

पुस्तके

अनंत भावे

# गुप्तहेरांच्या जगात

सध्या मराठीत ललितेतर लेखन बरेच केले जाते. युद्धविषयक सत्यकथा, आत्म-निवेदने यांच्या भाषांतरांचा अंतर्भाव अशाच लेखनात करावा लागेल. स्वतंत्र युद्धविषयक लेखन मराठीत जवळजवळ नाहीच. आणि वाचकवर्गाला तर युद्धकथा निरंतर रम्या वाटत असतात म्हणून भाषांतरित लेखन तो आवडीने वाचतो. काही भाषांतऱ्यांनी या क्षेत्रात नावही मिळवले आहे. श्री. द. पां. खांबेटे हे त्यातील एक. 'गुप्तहेरांच्या जगात (भाग १ ला)' हे त्यांचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

प्रस्तुत पुस्तकात गुप्तहेरांच्या दहा रोमहर्षक कथा लेखकाने सांगितल्या आहेत. यातील बऱ्याच कथा दुसऱ्या महायुद्धातील असाव्यात हे स्वाभाविकच होय. त्याशिवाय 'इस्त्राएली हेरांचे साहस' आणि 'प्रे. सुकार्नोचा खून करण्याचा कट' या अलीकडच्या काळातील हेरकथा सादर करून लेखकाने चांगला साक्षेप दाखवला आहे. या दहा कथांव्यतिरिक्त दोन लेख या पुस्तकात आहेत : १. प्राचीन नि अर्वाचीन हेर–संघटना २. गुप्तहेरांना मिळणारे विलक्षण प्रशिक्षण. या लेखांमुळे हेर-व्यवस्थेचे अंतरंग समजण्यास चांगली मदत होईल. या लेखात कथासूत्र नसले तरी निरनिराळ्या राष्ट्रांच्या हेरसंघटनांची माहिती शक्य त्या तपशीलासह सांगितल्यामुळे तेही वाचनीय झाले आहेत.

पुस्तकाला असे संकीर्ण स्वरूप हेतूपुरस्सर दिलेले आहे. प्रास्ताविक निवेदनात श्री. खांबेटे म्हणतात : 'गुप्तहेर संघटनांचे स्वरूप काय असते, गुप्तहेरांना कशा प्रकारचे प्रशिक्षण मिळते, त्यांची कारस्थाने नि कारवाया कशा रीतीने चालू असतात, गाफिल देशांची मर्मस्थाने कशा प्रकारे हुडकून काढली जातात, सरकारी नि लष्करी गुपिते कशी चोरली जातात, या कामी गुप्तहेर कोणकोणत्या विलक्षण हिकमती लढवतात, बेसावध सामान्य जनतेकडून आपल्या मतलबाच्या बित्तंबातम्या गुप्तहेर कशा काढतात इत्यादी गोष्टींची पुरेशी माहिती सर्वसामान्य जनतेला असणे अत्यंत अगत्याचे आहे. परंतु मराठीत अशी मार्गदर्शक माहिती फारशी उपलब्ध नाही. तशी माहिती यथाशक्य द्यावी हा प्रस्तुत पुस्तकाचा एक प्रमुख उद्देश आहे.'

श्री. खांबेटे यांचे कथानिवेदन सोपे आणि ओघवते आहे. तसे ते हवेच. नाहीतर उत्कंठापूर्ण कथेच्या अधाशी वाचनात व्यत्यय येऊ शकतो ... प्रस्तुत पुस्तकातील बऱ्याच कथा मी इंग्रजीतून वाचल्या होत्या. तरी या पुस्तकात मी त्या पुन्हा खुशाल वाचू शकलो. आता तर दुसरा भाग कधी प्रसिद्ध होणार, याची चौकशीही मी चालू केली आहे.

[ गुप्तहेरांच्या जगात : भाग एक : ले. द. पां. खांबेटे; रंजना प्रकाशन, मुंबई ]

## शॉज कॉर्नर

शॉज कॉर्नर हे हर्टफर्डशायर परगण्यातील बर्नार्ड शॉंच्या घराचे नाव होय. शॉ यांनी हे दुमजली घर १९०६ साली विकत घेतले. पुढील चव्वेचाळीस वर्षे शॉ याच घरात राहात होते. त्यांच्या पत्नीला लंडन येथील त्यांचे छोटे निवासस्थान आवडायचे; परंतु गर्दीपासून दूर जाऊ इच्छिणाऱ्या शॉंना मात्र 'शॉज कॉर्नर 'मध्ये राहणे अधिक मानवे.

स्वतः शॉंनी या घराला 'शॉज कॉर्नर' असे नाव दिले. खेडयातील इतर प्राचीन आणि सुंदर वास्तूंमध्ये ते उठून दिसते. कारण ते प्राचीन नाही, आणि सुंदरही नाही. १८९८ साली ते बांधण्यात आले आहे. शॉ तेथे राहायला आले तेव्हाच नाटककार म्हणून जगद्विख्यात झाले होते, खेडेगावातील मंडळी मात्र कीर्तिपेक्षा त्यांच्या मूर्तीनेच प्रभावित झाली होती.

१९५० साली शॉ दिवंगत झाले. 'शॉज कॉर्नर' राष्ट्रीय विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द करण्यात आले. शॉंनी या घराच्या व्यवस्थेसाठी कपर्दिकही मागे ठेवली नाही. या वास्तूला भेट देणाऱ्या असंख्य शॉ–भक्तांच्या देणग्यांनी व्यवस्थेचा प्रश्न समाधानकारक सुटलेला आहे. विश्वस्त मंडळाने घर जसेच्या तसे राखले आहे. इतके की दिवाणखान्यात प्रवेश केल्यावर, कोणत्याही क्षणी, शॉ साक्षात येऊन उभे राहतील असे वाटते.

दिवाणखान्याच्या कोपऱ्यात एक पियानो आहे. शॉंच्या पत्नीला संगीत आवडायचे. आजारपणात ती वरच्या मजल्यावरील एका खोलीत पडून राहायची, त्यावेळी शॉंचे पियानोवादन आणि गायन हा तिचा विरंगुळा असे. दुसऱ्या एका कोपऱ्यात, व्यायाम करण्यासाठी, पायचाकी यंत्र ठेवलेले आहे.

दिवाणखान्याच्या डाव्या बाजूला आहे शॉंची अभ्यासिका. येथे दररोज सकाळी सव्वादहा वाजता स्वारी लिहायला बसे. शॉंची आणखी एक छोटी अभ्यासिका घरापासून दूर असलेल्या एका झाडावरील फिरत्या झोपडीत होती. ही फिरती झोपडी

दूरध्वनीने घराशी जोडलेली होती. टेबलावर त्यांचे टंकयंत्र आहे; फायली आहेत.

अभ्यासिकेतच अर्थात शॉंचा ग्रथसंभार आहे. त्यातील काही पुस्तकांचा शॉंच्या नाटकांशी संबंध लावणे सहज शक्य आहे. शॉंच्या ग्रंथसंभारावरून त्यांच्या काहीशा वेगळ्या आवडीनिवडींचे, व्यक्तिमत्त्वाचे सहज दर्शन होते.

टेबलाशेजारी दोन छायाचित्रक (cameras) आहेत. छायाचित्रण हा शॉंचा पन्नास वर्षांचा छंद होता. मात्र त्यात प्रावीण्य त्यांना कधीच संपादन करता आले नाही.


अभ्यासिकेच्या पलीकडील दालन शॉंच्या पत्नीचे–शार्लटीचे–होते. या सुंदर विदुषीने आपल्या विलक्षण पतीची सेवा करता करता आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व पुसून टाकले होते.

या दालनापलीकडे आहे शाकाहारी शॉंची भोजनाची साधीसुधी खोली. खोलीच्या खिडकीच्या खाली असलेल्या कोचावर शॉ विश्रांती घेत. १९५० साली याच कोचावर त्यांनी चिरविश्रांती घेतली. सात वर्षे आधी शार्लटीचा अंत झाला होता.

जगाच्या कोनाकोपऱ्यात ज्यांचे नाव सहज पोचले त्यांनी आपल्या थडग्यावर पुढील समाधी–लेख कोरा असे सुचवले होते : ' जॉर्ज बर्नार्ड शॉ येथे चिरविश्रांती घेत आहे.'

कोण, होता तरी कोण तो ?'

[ ' रायटर्स हाऊसेस ' या ग्रंथावरून, ]



'विज्ञानसृष्टी'

दत्तप्रसाद दाभोळकर

## महावृक्ष कोसळल्यावर....

डॉ. भाभा, डी. डी. कोसंबी, प्रा. हाल्डन आणि आता डॉ. चंद्रशेखर रामन... भारतातील प्राचीन ऋषीमुनींच्या व्रतस्थ साधनेची आठवण करून देणारा आणखी एक दैदीप्यमान तारा २१ नोव्हेंबर १९७० रोजी निखळून पडला.

– डॉ. खोरानांना नोबेल पारितोषिक मिळाले त्यावेळची गोष्ट. भारतात शास्त्रज्ञांना पैसा आणि साधनसामुग्री उपलब्ध नाही म्हणून मारे हलकल्लोळ माजून राहिला होता. डॉ. रामन त्यावेळी विनम्रपणे म्हणाले होते, "मलाही नोबेल पारितोषिक मिळालेले आहे आणि त्यावेळच्या माझ्या त्या संशोधनावर मी भारतात राहून फक्त अडीचशे रुपये खर्च केले होते?" खरे पाहता डॉ. रामन यांनी हे शब्दात सांगण्याचीसुद्धा मुळी जरुरी नव्हती. कारण त्यांचे आयुष्य हाच मुळी एक दैदीप्यमान 'प्रकाशपट' होता. स्वातंत्र्यलढ्यातील मंत्रांनी भारावलेल्या बेहोशीच्या कालखंडात डॉ. रामन यांचे सारे तारुण्य गेले. भल्या मोठ्या पगाराची आणि मानमरातबाची एक सरकारी नोकरी या तरुणाने १९१७ साली अगदी सहजपणे सोडली. त्यानंतर असुतोष मुखर्जींच्या सांगण्यावरून हा तरुण कलकत्ता विद्यापीठात पदार्थविज्ञानाचा प्राध्यापक म्हणून कामाला लागला. प्रा. रामन यांना भारतीय संगीताचे आणि फुलांचे विलक्षण वेड होते. या त्यांच्या वेडातही भारतीयत्वाच्या छटा होत्या. गुलाबाची फुले त्यांना खूप आवडत. पण त्या फुलांचा गुच्छ बनविण्याऐवजी ती फुले झाडावर ठेवूनच पहावीत असा त्यांचा आग्रह असे. शास्त्रज्ञाचे संशोधन हे अनेकदा त्यांच्या इतर आवडींशी निगडीत असते. भारतीय संगीतांनी भारावलेल्या डॉ. रामन यांनी १९१७ ते १९२२ या कालखंडात मृदुंगाचा आणि पियानोचा शास्त्रीय अभ्यास केला. त्यांच्या आवर्तनांची गणिते समजावून घेऊन काही नवी गणिते पुढे मांडली. त्यानंतर अचानक डॉ. रामन यांनी आपले संशोधन क्षेत्र बदलले. गुलाबाच्या फुलांच्या अनेक छटात रंगून जाणारे आणि उगवतीचे आणि मावळतीचे रंग दररोज न चुकता पाहणारे डॉ. रामन नंतर प्रकाशकिरणातील रंगाकडे वळले.

प्रकाशकिरण लोलकातून बाहेर पडला तर आपणाला इंद्रधनु मिळते. हे इंद्रधनु

'सा, रे, गा, मा, प, ध, नि,' या सात रंगांचे बनलेले असते हे आपण जाणतो. डॉ. रामन यांनी हा प्रयोग वेगळ्या प्रकारांनी आणखी खूप पुढे नेला.--प्रकाश-किरण हा अनेक 'लहरी विस्तार अंकांचा' [wave length] बनलेला असतो. हा प्रकाशकिरण ज्यावेळी नेहमीपेक्षा वेगळ्या माध्यमातून बाहेर पडतो त्यावेळी प्रकाशकिरणाचे विकिरण होते. म्हणजेच आपणाला प्रकाशपट [spectrum] मिळतो. या प्रकाशपटात निरनिराळ्या 'लहरी विस्तार अंकांच्या' निरनिराळ्या रेषा आपणाला आढळून येत असतात. डॉ. रामन यांनी प्रकाशपटाचे, वर्णपट-दर्शकाच्या साहाय्याने सूक्ष्म निरिक्षण केले. असे निरिक्षण करताना डॉ रामन यांना एक विलक्षण गोष्ट आढळून आली. प्रकाशकिरणात प्रथमपासून असलेले 'लहरी विस्तार अंक' [wave length] दाखविणाऱ्या रेषा प्रकाशपटात होत्याच. पण काही नवे आगांतुक पाहुणेही त्या प्रकाशपटात आढळून येत होते. काही नव्या लहरी विस्तार अंकांचे [wave length] अस्तित्व दाखविणाऱ्या रेषाही प्रकाश-पटात अस्तित्वात होत्या. त्यानंतर डॉ. रामन आणखी थोडे पुढे गेले. प्रकाशपटा-तील लहरी विस्तार अंकात होणारा बदल हा प्रकाशकिरण ज्या परमाणूतून बाहेर पडला त्या परमाणूच्या अंतर्रचनेवर अवलंबून असतो, हे त्यांनी दाखवून दिले. म्हणजे, परमाणूच्या अंतरंगाला स्पर्श करून बाहेर पडणारे प्रकाशकिरण परमाणूची अंतर्रचना आपणाला समजावून देत होते. डॉ. रामन यांनी पुढे मांडलेले हे तत्त्व-ज्ञान 'रामन परिणाम' म्हणून ओळखले जाऊ लागले. प्रकाशपटाच्या या प्रकाराला 'रामनांचा प्रकाशपट' म्हणून संबोधण्यात आले. या प्रकाशपटाचे असंख्य फायदे झाले. नैसर्गिकरित्या मिळणारे रबर प्रयोगशाळेत बनविण्यापूर्वी त्यांची अंतर्रचना समजावून घेणे जरूर होते. 'रामनांचा प्रकाशपट' हे काम लगेच करून गेला. प्लॅस्टीकची व नव्या औषधी पदार्थांची रचना समजावून घेण्यात आणि त्यांची प्रत-वारी ठरविण्यात, त्यांची शुद्धता जोखण्यात हा प्रकाशपट बहुमोल कामगिरी करू लागला. रंगीत छायाचित्रणात या प्रकाशपटाने क्रांतिकारक बदल केले. --रामन यांच्या मूलभूत संशोधनाचे हे नानाविध व्यावहारिक फायदे लक्षात घेऊन १९३० साली त्यांना नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. खरे पाहता पदार्थ विज्ञाना-तील नोबेल पारितोषिक मिळविणारे डॉ. रामन हे आशियातील पहिले शास्त्रज्ञ. पण डॉ. रामन यांना मात्र यात काही फारसे नवे वाटले नाही. कारण हे संशोधन सुरू करण्यापूर्वीच याच्या जोरावर मी अगदी सहजपणे नोबेल पारितोषिक मिळवीन म्हणून त्यांनी जाहिरपणे सांगितलेले होते !

नोबेल पारितोषिकाच्या सर्वोच्च सन्मानानंतर डॉ. रामन सेवानिवृत्त झाले नाहीत तर नव्या उमेदीने ते आजन्म कार्यमग्न राहिले. नोबेल पारितोषिक म्हणून मिळालेली भली मोठी रक्कम खर्च करून संशोधनासाठी त्यांनी तीनशे मौल्यवान हिरे खरेदी केले. १९४६ साली सिलोनमधील शास्त्रीय परिषदेत बोलताना

रामन यांनी हिऱ्यासंबंधीचे आपले वेगळे संशोधन पुढे मांडले. काही हिऱ्यांच्या अणुतून ज्यावेळी नीलातीत प्रकाशकिरण [ultra violet rays] बाहेर पडतात त्यावेळी सातत्याने प्रकाशमान राहणारे तेजस्वी प्रकाशपट आपणाला मिळतात. म्हणजे आणखी काही दशकांनी, जगभर शांत व उज्वल प्रकाशासाठी वेगळ्या प्रकारचे हिऱ्याचे दिवे प्रचारात येऊ शकतील. हिऱ्यांच्या रचनेतील नवे नवे पैलू जगासमोर मांडणे हा डॉ. रामन यांचा वैज्ञानिक छंद होता आणि या छंदाबरोबर इतरही अनेक प्रकारचे संशोधन ते करीत होते. अनेक वायूंच्या चुंबकीय शक्तींचा तौलनिक अभ्यास सर्वप्रथम त्यांनीच केला. धातूंमधून जाणाऱ्या विद्युतप्रवाहाच्या गतीबाबतही त्यांनी संशोधन केले. द्रव पदार्थात दर सेकंदाला शंभर कोटी ते हजार कोटी आवर्तने करणाऱ्या ध्वनिलहरी अस्तित्वात असतात, तर घन पदार्थात होणाऱ्या अशा आवर्तनांची संख्या अब्जावधी असते हे डॉ. रामन यांनीच प्रथम सप्रयोग पटवून दिले. पदार्थाच्या 'स्वाग्रहा' [Elasticity] संबंधीच्या त्यांच्या संशोधनाने फ्रेंच शास्त्रज्ञ कॉचीचे सिद्धांत अपुरे ठरले तर १९५९ साली त्यांनी मांडलेल्या प्रकाशकिरणाच्या विवर्तना [Dittraction of light] बाबतच्या सिद्धांताने ब्रिस्चॉक साहेबांनी पुढे मांडलेला सिद्धांत खोटा ठरला.

संशोधनाच्या बेहोशीत सदैव मग्न राहणे हा डॉ. रामन यांचा स्थायीभाव होता. बंगलोरला त्यांच्या प्रयोगशाळेच्या बाहेर एक रोखठोक सूचना फलक लावलेला होता.

'Not Open To The Visitors. Please Do Not Disturb Us'. या सूचना फलकाची चपराक खाऊन काही केंद्रीय मंत्र्यांनाही प्रयोग शाळेच्या दरवाजातून माघारे फिरावे लागले होते! भारतातील संशोधन क्षेत्रातील आजच्या दिखाऊपणाचा डॉ. रामन यांना मनस्वी राग होता. संशोधन मंदिरात घुसलेली वशिलेबाजी, प्रांतीयता आणि गलथानपणा त्यांना अस्वस्थ करीत होता. गेल्या वर्षी भारतात आलेल्या एका फ्रेंच शास्त्रज्ञाला ते म्हणाले होते, 'आता भारतात आल्यावर फक्त एकच ताजमहाल पाहण्याची जरूरी नाही. अत्याधुनिक शास्त्रीय साधनसामुग्री पुरुन ठेवण्यासाठी राष्ट्रीय प्रयोगशाळांच्या स्वरूपात अनेक अलिशान ताजमहाल आज भारतभर उभे आहेत!'—भारतातील तरुण कर्तृत्वान आत्मसंतुष्टवृत्ती आणि तरुण वयातच, आपण काही फार मोठा फड गाजवला आहे असे समजून उस्ताद म्हणून कट्यावर बसण्याची त्यांची वृत्ती याच्याविरुद्ध पहिला आवाज डॉ. रामन यांनीच उठविला होता. ते म्हणाले होते, 'आमचे तरुण शास्त्रज्ञ हुशार आहेत. पण वृद्धापकाळीही कार्यमग्न राहणाऱ्या ऋषीमुनींच्या या प्राचीन भूमीत, तरुणकाळीच वृद्धावस्था जगणारे आधुनिक ऋषी या तरुण शास्त्रज्ञांच्या रूपाने आज वावरताहेत!'

—डॉ. रामन यांच्या निधनाने आपल्या तरुण शास्त्रज्ञांना, त्यांच्या खुरटलेल्या

वाढीची आठवण करून देणारा आणखी एक महावृक्ष उन्मळून पडला आहे. आणि नकळत पाडगावकरांच्या ओळी आठवताहेत.

**महावृक्ष कोसळल्यावर...**

सूर्यबिंब पकडणाऱ्या त्याच्या फांद्या आठवतात,
चंद्र भाळी धरणारी त्याची उंची जाणवते :
–आणि मग आकाश आपल्या डोक्यावर पेलणाऱ्या
सभोवतालच्या काटेरी झुडपांची भीति वाटते
...त्यांचे हात आपली धोतरे ओरबाडतील यासाठी !

## ययाती...

कोट्टायमला आयुर्वेदीक उपचारांसाठी गेलेले राष्ट्रपती गिरी खरोखरच दहा वर्षांनी तरुण होतील का ?–ते तरुण झाले तर राष्ट्राच्या एकूण धोरणाला काही तडफदार वळण लागेल का ? हे सारे प्रश्न अर्थातच महत्त्वाचे आहेत. पण अखेर हे प्रश्न विज्ञानेश्वरी ऐवजी दिल्ली दरबारच्या कक्षेत येतात !


पण जगभरच्या शास्त्रज्ञांच्या दृष्टीने हे प्रयोग फार महत्त्वाचे आहेत. 'चिनी कायाकल्प वापरून माओ वीस वर्षांनी तरुण झाला असेल का ?' या विषयावर अमेरिकेत जाहीर परिसंवाद झालेले आहेत. मानवी तारुण्य ही एक विलोभनीय गोष्ट आहे. मानवी जीवनातला हा सर्वोत्कृष्ट कालखंड. शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या याच काळात माणूस सर्वात अधिक कार्यक्षम असतो. आणि मानवाचे तारुण्य वाढवण्यात यशस्वी होणे हे शास्त्रज्ञांचे एक आवडते स्वप्न आहे. प्राचीन भारतीय, चिनी व इराणी वैद्यकाला ही किमया अवगत असेल असे काही शास्त्रज्ञांना मनापासून वाटते. योगाचा अभ्यास करणारा माणूस वृद्धापकाळीही तरुणाला लाजवेल असे काम करतो हे एक शास्त्रीय सत्य आहे.

तारुण्य म्हणजे उत्साह. तारुण्य म्हणजे अफाट शारीरिक आणि मानसिक कार्यक्षमता. आता आपला उत्साह हा अनेक वेळा भोवतालच्या वातावरणावर अवलंबून असतो आणि माणसाच्या भोवतालचे वातावरण बदलून त्याला तरुण बनविण्याचे काही वेगळे प्रयोग ओहियो विद्यापीठातील डॉ. कुंड्झ आणि डॉ. डफी यांनी नुकतेच हातावेगळे केले आहेत. प्राथमिक स्वरूपाच्या प्रयोगात फार मोठे यश या शास्त्रज्ञांनी मिळवले आहे. हे प्रयोग त्यांनी प्रयोगशाळेतील उंदरांच्यावर केले. आपल्या सभोवतालच्या हवेतील हवेचे काही परमाणु ऋण वा धन विद्युत धारण करणारे असतात. या हवेच्या परमाणूंना आपण वीजवंतदल [ Air ious ]

असे म्हणतो. सर्वसामान्यपणे, आपल्या भोवतालच्या हवेतील वीजवंत दलाचे प्रमाण दर सेंटीमीटर घन हवेत, बाराशे वीजवंत दल असे असते. या वीजवंत दलातील निम्मे परमाणु ऋण विद्युत धारण करणारे तर उरलेले घन विद्युत धारण करणारे असतात.

डॉ. कुंडझ आणि डफी यांनी तरुण व म्हातारे उंदीर घेतले. त्यांच्या भोवतालच्या हवेतील वीजवंत दलाचे [ionized air] प्रमाण खूप वाढवले. आणि त्यांच्या स्मरणशक्तीत आणि कार्यशक्तीत पडलेला फरक मापला. हा फरक मोजण्यासाठी त्यांनी एक वेगळा प्रयोग केला. उंदरांना एका थंड पाण्याच्या बोगद्यात सोडण्यात आले. या बोगद्यातील पाणी उंदरांना मानवणार नाही इतके थंड ठेवले. मात्र त्या बोगद्यातील पाणी पोहून गेल्यावर उंदरांना आवडेल अशा एका उबदार खोलीत ते प्रवेश करत होते. थोडक्यात, किमान वेळात हे पाणी पोहून जाणे उंदरांच्या दृष्टीने आवश्यक होते. तीन वेगवेगळ्या वातावरणात काही दिवस ठेवलेल्या उंदरांची कार्यशक्ती त्यांनी या प्रकारे मापली. 'अ' गटातील उंदीर नेहमीच्याच हवेत ठेवलेले होते. 'ब' गटातील उंदरांना प्रती घनसेंटीमीटर हवेत तीन लाख घनविद्युत दल [ positire ious ] असलेल्या हवेत ठेवले होते. 'क' गटातील उंदीर प्रती घन सेंटीमीटर हवेत दीड लाख ऋणविद्युत दल [ negative ious ] असलेल्या हवेतील होते.

'अ' गटातील उंदराच्या प्रयोगाचे निकाल अर्थातच अपेक्षित होते. त्या गटातील तरुण उंदीर वृद्ध उंदरांच्यापेक्षा सहा पट वेगाने ते अंतर तोडत होते. म्हाताऱ्या उंदरांचा वेग तर कमी होताच पण बोगद्यातून पोहताना ते अनेकदा गोंधळतही होते. हा पोहून जाण्याचा प्रयोग जसा अनेकवार करण्यात आला तसतसा म्हाताऱ्या उंदरांना तरुण उंदरांच्याहून फक्त दीडपट अधिक वेळ लागू लागला. सहाप्रयोगांच्या नंतर, दरवेळी हा वेळ दीडपटीने अधिक एवढा कायम राहिला. 'ब' गटातील उंदरांच्या प्रयोगाचे निष्कर्षही यापेक्षा वेगळे नव्हते. 'क' गटातील उंदराच्या प्रयोगात मात्र काही वेगळे घडले. 'क' गटातील म्हातारे उंदीर फार झपाट्याने हे अंतर तोडत होते. 'अ' गटातील म्हाताऱ्या उंदरांना पहिल्या प्रयोगाच्या वेळी हे अंतर पोहून जावयास चाळीस मिनिटे लागली. तर 'क' गटातील उंदीर पहिल्या प्रयोगाच्या वेळी फक्त अकरा मिनिटे आणि चाळीस सेकंदात हे अंतर पोहून गेले. तिसऱ्या प्रयोगाच्या वेळी 'क' गटातील म्हतारे उंदीर 'अ' गटातील तरुण उंदरांच्याहून अधिक वेगाने हे अंतर पोहून गेले. मात्र 'क' गटामधील तरुण उंदरांच्या कार्यक्षमतेत 'अ' गटातील तरुण उंदरांच्या कार्यक्षमतेपेक्षा अधिक सुधारणा झालेली नव्हती. त्यानंतर 'ब' गटातील वातावरणात अठरा दिवस ठेवलेले उंदीर त्यांनी १८ दिवस 'क' गटातील वातावरणात ठेवले. अशा प्रकारे बनलेल्या नव्या गटाला आपण 'ड' गट




१. म्हातारे उंदीर [ अ गट ]  ३. तरुण उंदीर [ अ गट ]
२. म्हातारे उंदीर [ ड गट ]  ४. तरुण उंदीर [ ड गट ]

म्हण. 'ड' गटातील म्हातारे उंदीर कायम 'अ' गटातील तरुण उंदरांच्याहून अधिक कार्यक्षम होते. फार कमी वेळात हे अंतर 'ड' गटातील म्हातारे उंदीर पोहून जात होते.

खालील आलेखावरून ही गोष्ट अधिक स्पष्टपणे लक्षात येईल.

मात्र उंदरांच्या बाबत यशस्वी होणारे हे प्रयोग माणसांच्या बाबतही लागू पडतील का हे अजून ठरावयाचे आहे. काही मानस शास्त्रज्ञांच्या मते हे सहजशक्य आहे. कारण तरुण काळ आणि वृद्धावस्था ही सर्व प्राण्यांच्या बाबत एकाच साच्याची असते. शिकण्याच्या, स्मरण शक्तीच्या क्रियांमध्ये पण एक प्रकारचा ठरीवपणा असतो. – माणसाची स्मरणशक्ती सर्वात अधिक कार्यक्षम अठरा ते पंचवीस या वयात असते. त्याच काळात शारीरिक जोमही सर्वाधिक असतो. पंचवीशीनंतर दर वर्षाला सुमारे एक टक्का या प्रकारे काही काळ या शक्ती कमी होतात. पुन्हा काही काळ या शक्ती कायम राहतात. पुन्हा घटीचा कालखंड सुरु होतो. – हे चक्र पुढील काही वर्षात आपण रोखणार आहोत. डॉ. कुंडश आणि डफी यांचा प्रयोग आज माणसांच्यावर सुरू झाला आहे. माणसांच्यासाठी हवेतील वीजवंत दलांचे प्रमाण काय ठेवावे? हा प्रयोग किती काळ करावा? आलेले तारुण्य कायम रोखण्यासाठी हा प्रयोग किती कालावधीने पुन्हा पुन्हा करावा लागेल? असे अनेक प्रश्न ते दोन शास्त्रज्ञ आज सोडवताहेत. ◻ ◻ ◻

श्रीकांत आंबेकर

# दूरच्या ग्रहांकडे

-मानवाच्या प्रगतीचे श्रेय घेणाऱ्या काही प्रमुख गोष्टीत मानवाची प्रवास करण्याची सवय येतेच येते. अगदी अनादीकालापासून इतस्ततः भटकत भटकत तो सतत अज्ञाताचा वेध घेत आला आहे. या अज्ञाताचे स्वरूपच प्रत्येक वेळी बदलत होते. प्रथम त्यानं आसपासची भूमि शोधली, देश पालथे घातले. समुद्रप्रवास केला. महासागरी मार्ग धुंडाळले, खंडाचा शोध लावला, ध्रुव सर केले. अन् मग एक काळ असाही आला की त्यामध्ये मानवाने प्रथमच वातावरणातून प्रवास केला आणि आता तर तो वातावरणाच्या मर्यादाही उल्लंघून गेला आहे.


काही म्हणा पण आजच्या या यानांबद्दल विचार करताना एक जरासा चमत्कारिक प्रश्न मनात चमकून जातो. वाटतं, आजच्या या यानांबद्दल तिसाव्या शतकातील पृथ्वीवासीय कोणते मत व्यक्त करतील बरं? तुमचा कांही अंदाज?— काय म्हणता, या यानांकडे पाहून ते, 'छे, काय बेढब अन् अकार्यक्षम यंत्रे होती ही' असं म्हणून तुच्छतेने हंसतील? खात्री आहे तुमची?— मला नाही तसं वाटत. उलट सूज्ञपणे 'असतील जराशी बेढब वा अकार्यक्षम! पण हीच तर याने जी अवकाशात सर्वप्रथम झेपावली त्यांचं कर्तृत्व निश्चितपणे अमूल्यच आहे' असा विचार करून कौतुकमिश्रित नजरेने त्यांच्याकडे पाहतील. आपण नाही का आज कोलंबसच्या गलबतांकडे कौतुकाने पहात? तसंच!

ग्रहप्रवास करणारे प्रवासी-अग्निबाण अजून प्रत्यक्षात उतरायचे आहेत. पण शास्त्रज्ञांनी त्याचे मार्ग मात्र आताच ठरवून पक्के केले आहेत.

पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण तोडून सूर्याचा उपग्रह बनलेलं यान लंबवर्तुळाकार कक्षेत अथांग अवकाशात फिरत राहील. शास्त्रज्ञांच्या हिशेबानुसार, या अंतरिक्षातच कुठेतरी अग्नियानाचा पथ शुक्र, मंगळ, बुध, वा इतर कुठल्यातरी ग्रहाची कक्षा छेदून जाईल. हे छेदनबिंदू अगदी अचूकरित्या आजही ठाऊक आहेत. पण तिथपर्यंत पोचायला बरेच महिने लागतील. मंगळाकडे जाणारे पहिले प्रवासी आपल्या प्रवासात किमान एक वर्ष घालवतील. शुक्राची सहल बहुधा शंभर दिवसातच आटोपू शकेल. हा काळ तसा लहान नाही. म्हणूनच प्रश्न उभा राहतो की, भावी काळात

अंतरिक्ष सफर करणारी आपली 'कोलंबस' मंडळी या लांबलचक प्रवासात कशी काय टिकून राहणार ? या प्रश्नाचे उत्तर काही अंशी ज्ञात आहे.

आतापर्यंत झालेल्या अवकाश मोहिमा, आवश्यक 'वातावरण' कृत्रिमरीत्या टिकवून धरणाऱ्या केबिन्समधून घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षा, अंतरिक्षात वापरण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचा अवकाशयात्रिकांवर बऱ्याच काळपर्यंत केलेला वापर, आणि इतर महत्त्वाच्या चाचणीपरीक्षा यातून जे निष्कर्ष निघाले आहेत ते असं सांगतात की, ग्रहप्रवास करणाऱ्या पहिल्या प्रवाशांना प्रवासात तसं काही विशेष अवघड वाटणार नाही. ठाउक नसलेली एकच महत्त्वाची गोष्ट म्हणजे सतत अनेक महिने वजनविरहित अवस्थेत राहिल्याचा परिणाम.



प्रवासात येणाऱ्या संकटांपैकी महत्त्वाचे संकट म्हणजे उल्का ! उल्का म्हणजे अवकाशात इतस्तत: भ्रमण करणारे खडक होत. पैकी प्रचंड आकाराच्या उल्का तशा दुर्मिळच असतात. बहुतेक साऱ्या उल्का म्हणजे केवळ धुळीचे कण असतात. अन् त्यांचे वजन एक किलोग्रॅमहूनही कमीच असते. असं असले तरी, अवकाशीय वस्तूंचे भन्नाट वेग लक्षात घेता या उल्कासुद्धा चांगल्याच धोकादायक ठरतात.

केवळ अडचणींची चर्चा करत बसण्यापेक्षा आपण अशी आशा व्यक्त करू या की, हे सारे धोके एक दिवस मागे टाकून आपले अग्नियान एखाद्या नव्या, विचित्र अन् अज्ञात ग्रहाजवळ जाऊन पोहोचेल. त्यांतली प्रवासी मंडळी काही लगेच ग्रहावर उतरण्याची घाई करणार नाहीत. प्रथम आपले यान ते त्या ग्रहाभोवती कांही काळ फिरत ठेवतील आणि मग एखाद्या छोट्याशा 'ग्रह. याना'तून ते खाली ग्रहावर उतरतील. या नव्या जगात त्यांना काय काय सापडेल बरं ?— चित्रविचित्र पर्वत ? वाळवंटे ? समुद्र ?? हो ! हो ! ! हे सारं काही ! ! ! अन् शिवाय अज्ञात असं एखादे संकट सुद्धा. संकटच ते— पण तरी देखील किती रोमांचकारी असेल ! नाही ?

( क्रमश: )

# रंगभूमी । शरद गोखले

## राज्य नाट्य महोत्सव,

## केंद्र पुणे

## लेखांक एक

अरुण सरनाईक एक कलंदर आसामी. नाटक सुरू होते आणि ही स्वारी चक्क तुमच्याशी बातचित सुरू करते. थोडं तुमच्या संबंधी थोडं स्वतः संबंधी. असं करत करत एका विशिष्ट प्रसंगापाशी आल्यावर तो बावचळतो. आणि बारा वर्षापूर्वी त्याच्या आयुष्यात घडलेल्या प्रसंगाकडे तुम्हाला घेऊन जातो.

श्री. विजय तेंडूलकर यांचे हे नवीन नाटक पी. डो. ए. या नामवंत संस्थेने राज्य नाटयमहोत्सवामध्ये सादर केले. स्पर्धेमध्ये झालेल्या नाटकांपैकी सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून या नाटचप्रयोगाचा उल्लेख करावा लागेल.

अरुण सरनाईक हा एक सडाफटींग प्राणो, एकाकी आयुष्य स्वखुशीने पत्करणारा. असाच एकदा आलिबागला आला असताना डी. डब्लू. पराडकर नावाचे गृहस्थाचे घराच्या खिडकीत एक काकूबाई टाईप परंतु 'माल' छोकरी पाहतो. सहज उत्सुकतेने घरात पाहुणा म्हणून प्रवेश करतो. आणि त्याच्या लक्षात येते ज्या मुलीला पाहून आपण पराडकरांच्या घरात चक्क घुसलो ती पोरगी मवाळ, आणि स्वत्व हरवलेली आहे. पोरीच्या लग्नाच्या चिंतेने पराडकर कुटुंबीय अस्वस्थ झालेली आहेत. काही करून पोरीला भेटलंच पाहिजे असं ठरवून अरुण तिला गाठतो. साधं, सोपं, या वयातल्या कोणत्याही पोरीला रुचेल, आवडेल, असं तिच्याशी बोलू लागतो.—पोरगी हळूहळू खुलू लागते. तितक्याच सहजतेने त्याच्याशी बोलू लागते. दोघेही रंगून जातात. या स्वत्व हरवलेल्या मुलीच्या मनात आत्म-विश्वास निर्माण होतो. तिचे तीपण तिला सापडते. आणि मग बघायला आलेला एक झकासता मुलगा तिला चक्क पसंत करतो. घरातील वातावरण बदलते. सरूचे लग्न ठरल्याने बंडाची वाट मोकळी होते. आणि या आनंदमयी वातावरणावर चक्क बाँबगोळा पडावा अशी अवस्था ही सुकन्या निर्माण करते. आपण या मुलाशी मुळीच लग्न करणार नाही. इतकेच नाही तर घरात घुसलेल्या पाहुण्याशी आपण लग्न करू अशीही घोषणा तो करते. हाणामारी होते. अगदी

अरुण सरनाईकापासून सर्व मंडळी प्रयत्न करतात. आपल्याला का नाकारले हे समजावून घ्यायला आलेला विश्वासही परिस्थिती समजून चुकतो. आणि स्वतःच सरू आणि अरुणच्या लग्नाचे ' प्रपोजल ' मांडतो—अगदी थेट बंगाली हीरोप्रमाणे. अरुणलाही हे सर्व खरं म्हणजे हवं असतं, आपणही गृहस्थ व्हावं, चार चौघांसारखा संसार करावा, इत्यादी इत्यादी. पण हे सर्व तो निग्रहाने मोडून काढतो आणि घर सोडतो.

आता प्रेक्षकांसमोर उभा आहे तो अरुण या जुन्या हृदयस्पर्शी स्मृतींनीही अस्वस्थ झाला आहे. काही तरी हरवल्याची, कायमचे गमावल्याची भावना त्याचे स्वास्थ्य घेऊन गेली आहे. तो विश्वास आणि ती सरू यांचे अशा अन्य कथात होते तसेच लग्न झाले आहे आणि अचानक अरुण जवळ येऊन चॉकलेट घेणारा तो छोटा छोकरा त्याला आणखी अस्वस्थ करतो. पण ही अस्वस्थता कबूल करण्याची त्याची तयारी नाही. खोटी जिद्द दाखवत तो तसाच पुढे चालला आहे. सुधीर फडके यांनी सुरेल आवाजात गायलेल्या अशी पाखरे येती या काव्यपंक्तीबरोबर नाटक संपते.

तसं हे नाटक अगदी सरळ. तेंडूलकरांचे असूनही समजायला सोपे. नाटयलेखनातील कौशल्य, पी. डी. ए. चा सुंदर प्रयोग, कलावंताची उत्कृष्ट कामगिरी, आणि जब्बार पटेल यांनी दिग्दर्शक या नात्याने बजावलेली कामगिरी यामुळे स्पर्धेतील हा प्रयोग चांगलाच रंगला. जब्बार पटेल (अरुण सरनाईक) कल्पना भालेराव (सरू) मीना पुराणिक (आई) दिलीप जोगळेकर (बंडा) मोहन आगाशे (अण्णा) विद्याधर वाटवे (विश्वास) या सर्व कलावंतांच्या सांघिक प्रयत्नातून एक सुबक रेखीव नाटयकृती उभी राहिली. संघ स्वयंसेवक बंडाचा ' व्हिलन ' म्हणून उल्लेख केला असला तरी त्याचा, आणि त्याच्या तोंडी असलेल्या संवादाचा रिलीफसाठी उपयोग करून घेतला आहे. वास्तवतेची पातळी नाटकाला नाही. वास्तवतेची फूटपट्टी लावण्यात काही अर्थही नाही. तेंडूलकरांनी लेखनाचे बाबतीत जो सूर पकडला आहे. तो दिग्दर्शकाला व कलावंतांना अचूक सापडल्याने प्रयोगाचे यश वाढले. अरुणचे अतिशय महत्त्वाचे व अवघड काम जब्बार पटेल यांनी सुरेख केले. क्वचित प्रसंगी त्यांची अभिनय पद्धती भडक, जरुरीपेक्षा जास्त सहज, व त्यामुळे कृत्रिम वाटली. कल्पना भालेराव यांनी सरूची अवघड भूमिका व्यक्तिरेखेची सर्व वैशिष्टये लक्षात घेऊन साकार केली. दिलीप जोगळेकर—यांचा चेहऱ्यावर कसलेच भाव न दर्शविणारा संघी बंडा मोठा झकास होता. विश्वासला फारसा वाव नाही. भूमिकाही अवघड पण विद्याधर वाटवे यांनी ही कामगिरी छान पार पाडली. आई अण्णांची जोडीही चांगली होती.

नेपथ्य, प्रकाश योजना, पार्श्वसंगीत, या तांत्रिक बाजू चांगल्या होत्या. जब्बार पटेल, यांनी अंकांची तोड चांगली साधली होती. अंतिम फेरीत या नाटकाला यश

मिळाले, तरी आश्चर्य वाटू नये अशा उंचीचा प्रयोग पहावयास मिळाला. हमखास चांगल्या प्रयोग देणाऱ्या जुन्या संस्थांपैकी एक महाराष्ट्रीय कलोपासक जवळजवळ बंद पडल्यातच जमा आहे. पी. डी. ए. च्या चालू वर्षीच्या प्रयोगाचे वैशिष्ट्य म्हणजे महविद्यालयीन रंगभूमीवर दिसलेले अनेक कलावंत या संस्थेने राज्य पातळीवरील या स्पर्धेमध्ये आणले. हा उपक्रम स्वागतार्ह म्हटला पाहिजे.

## निखारे

प्रयोगाच्या यशामध्ये दिग्दर्शकाचा वाटा फार मोठा असतो. चांगला दिग्दर्शक प्रयोगाचे यश निश्चितपणे वाढवतो. अनंत ओक यांनी स्पर्धेसाठी बसवलेली अनेक नाटके मी पाहिली. त्यांनी बसवलेल्या नाटकांवर त्यांची स्वतःची अशी छाप असते. या वर्षी सरस्वती मंदिर नटसंघासाठी त्यांनी रत्नाकर मतकरी यांच्या 'निखारे' या नाटकाचे दिग्दर्शन केले. झोपडपट्टीत राहणाऱ्या अठरा वर्षाच्या एका कोवळ्या पोरावर स्वतःच्या वडिलांचा खून केल्याचा आरोप आहे. कोर्टा-समोरील केसचे काम संपले आणि ज्यूरी मंडळी निर्णयासाठी एकत्र जमली आहेत. त्या पोरासंबंधी कुणालाच प्रेम नाही. मुलगा दोषी असे जवळजवळ एकमत आहे. ज्यूरीपैकी केवळ एक विरुद्ध आहे. वादविवाद घालून भांडण करून आपले म्हणणे तो इतरांच्या गळी उतरवतो. मुलगा दोषी का निर्दोषी या संबंधी निर्विवाद पुरावा नसल्याने मुलाला संशयाचा फायदा मिळाला पाहिजे असे त्याचे मत असते. आपले हे मत इतरांना पटवून देण्यात तो यशस्वी होतो.

नाटकात स्त्री पात्रे नाहीत, कोणी पात्रे येत नाहीत अथवा जात नाहीत. असे असूनही प्रेक्षकांना प्रयोगात गोडी वाटते, याचे श्रेय मतकरींचे लिखाण, आणि अनंत ओक यांचे दिग्दर्शन याला द्यावे लागले.

जवळ असलेल्या कलाकरांपैकी ज्याला उत्तम, उत्कृष्ट म्हणावे, असा जवळजवळ एकही कलावंत नाही. सर्व कलाकार साधारणपणे हौशी रंगभूमीवरील दुसऱ्या पातळीचे. या सर्व कालाकरांवर मेहनत घेऊन एक एकसंध प्रयोग उभा केल्याचे श्रेय श्री. ओक यांना द्यावं लागेल. प्रथमपासूनच इतरांपासून वेगळा असलेल्या आर्किटेक्टचे वेगळेपण त्यांनी त्यांच्या हालचालीतून प्रतीत केले. मागल्या प्लॅट-फॉर्मचाच यासाठी त्यांनी चांगला उपयोग करून घेतला.

तर्कशुद्ध पद्धतीने संपूर्ण केसचा विचार करणारा ज्यूरी, आणि आर्किटेक्ट यांना पहिला अंक संपवताना समोरा-समोर उभे करण्यात दिग्दर्शन कौशल्य दिसते. संपूर्ण काळ्या पार्श्वभूमीवरील पांढरी चौकट मात्र खटकली, विशेषतः नाटकाचे अखेरीस त्यावर प्रकाशझोत टाकल्याने तिला सत्याचे प्रतीक, असा प्रतिकात्मक अर्थ प्राप्त झाला. वास्तविक आरोपी सुटतो तो संशयाचा फायदा मिळून. तो दोषी असेलही, किंवा नसेलही अशा अवस्थेत त्याला संशयाचा फायदा दिला

जातो. ज्यूरी मंडळी बसतात. तेव्हा घड्याळाचे टोले दिले आहेत, एकमुखी निर्णय दिला जातो त्यावेळीही टोले दिले आहेत. मग मधलेच टोले कशासाठी गाळले ? ते दिले असते तर परिणामकारक झाले असते. कलाकारांपैकी ज्यांचा विशेषत्वाने उल्लेख केला पाहिजे ते म्हणजे शाम पटवर्धन, रंगा संत, अशोक जोशी व काहीसे भडक आणि अतिरंजित वाटले, तरी परिणामकारक ठरलेले शशी बडवे.

आता लेखनासंबंधी थोडेसे. मतकरी यांनी हे नाटक वेल अँग्री मॅन, वरून घेतले आहे. नाटकाचे मराठीकरण त्यांना चांगले जमले आहे. अर्थात या सर्व रचनेत लेखनाचे दृष्टिने दोष असा की, खुनी मुलाला निर्दोष सोडायचा हे निश्चित करून त्याला दोषी ठरवला आहे. सबंध पुरावा त्या पद्धतीने भरपूर ' लूप होल्स ' ठेऊन उभा केला आहे. आणि मग हळूवारपणे एक एक दोष दाखवत मुलाला निर्दोष ठरवला आहे. ' बाईच्या चष्म्याचा उल्लेख', हे त्याचे ठळक उदाहरण आहे.

हिरा जो भंगला नाही, या सौ. मालतीबाई बेडेकर यांच्या नाटकाचा प्रयोग व्यावसाईक रंगभूमीवर यशस्वी ठरला नाही. प्रयोगाचे कौतुक झाले, परंतु आर्थिक दृष्टया नाटक अयशस्वी ठरले. असे हे नाटक भरत नाट्यमंदिराने घेतले. आणि बाबूराव विजापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली नाटकाचा सुविहीत प्रयोग सादर केला.

निजाम सरहद्दीवरील सकिना हे एक हिन्दू अधिपत्याखालील संस्थान. रझाकारांचे चळवळीचा जोरदार तडाखा या संस्थानाला बसला. राजघराण्याची धूळदाण उडाली. त्यातच राजकन्या नंदिनी नाहीशी झाली. राजकन्या मेली का जिवंत आहे या संबंधी सकिनाची प्रजा तसेच राजकुटुंबीय मंडळी साशंक आहेत. परदेशी बँकेमध्ये या राजकन्येच्या नावावर करोडो रुपयांची मालमत्ता पडून आहे. संस्थाने गेली, स्वाभाविकपणे संस्थानी जहागिरदारांचे महत्त्व, सत्ता, संपत्ती, यांनाही ओहोटी लागली. सकिना संस्थानचे असेच एक मानकरी त्रिंबकजी, सेतूमाधव, आणि गणाचार्य या दोन तोंडपुंजक्या सहाय्यकांना बरोबर घेऊन नंदिनीला शोधून काढण्याच्या मोहिमेवर निघतात. त्यासाठी कर्ज काढतात. परंतु राजकन्या काही मिळत नाही. अखेरीस पवई तळ्यात बुडता बुडता वाचवलेल्या एका पोरीस ते राजकन्या करतात. राजमातेला त्रिंबकजीच्या या कारस्थानांचा विलक्षण तिरस्कार असतो. तसे ती बोलूनही दाखवते. तथापि राजकन्या नंदिनी अनेक बारीक सारीक दाखले देऊन आपली ओळख पटवते. आणि आजीच्या मायेचा हात पाठीवर फिरल्यावर समाधानी होऊन संपत्तीचा मोह सोडून नाहीशी होते. त्रिंबकजीची स्वप्ने धुळीस मिळतात. नाटकाची बांधणी चांगली जमली आहे. संवाद रचनाही आकर्षक आहे. भरत नाट्यमंदिराने नाटकाचा प्रयोग मोठ्या वैभवात सादर केला. त्रिंबकजीचा संस्थानी थाटाचा महाल, उणेपणा न पडून देता उभा केला होता. प्रकाश-योजना, संगीत यामुळे प्रयोगाची रंगत वाढेल अशी दक्षता घेण्यात आली होती. चांगले नाटक आणि चांगली निर्मिती यांना भडक दिग्दर्शनाची व समर्थ कलावंतांची

जोड मिळती तर...... अर्थात जर, तर चा विचार करण्याचे कारण नाही कलाकारांपैकी उदयसिह पाटील, यांना आपली भूमिका समजली नाही. अभिनय आणि संवादफेक, यांची या नाटकाला हानिकारक ठरणारी अशी एक वेगळीच पट्टी लावून त्यांनी स्वतःला अन्य कलाकारांपासून वेगळे पाडले. पाटील यांच्या त्रिंबकजीने प्रयोगाचे यश निश्चितपणे कमी केले. आनंद पानसे व ताम्हनकर (आण्णासाहेब यादव) हे कलाकारही फिके पडले. असे असूनही नाटकाला जे यश मिळाले, त्यात सौ. सरोजिनी उमराणीकर, व पद्मजा केतकर यांचा फार मोठा वाटा आहे. दुसऱ्या अंकातील या दोघींचा महत्त्वपूर्ण प्रवेश अतिशय यशस्वी झाल्याने प्रयोग यशाची उंची एकदम वाढली. बाबुराव विजापुरे यांनीही नंदिनी बरोबरील त्यांच्या प्रवेशात चांगलाच रंग भरला. राजाभाऊ फडणीस व गंगाधर मुंगळे ही जोडगोळी चांगली वाटली. विजय जोगळेकर आपल्या भूमिकेला न्याय देऊ शकले नाहीत. पहिल्या अंकात त्रिंबकजी नंदिनीला घेऊन येतो. (ती नंदिनी असल्याची त्याला कल्पना नसते, अथवा त्या वेळी तरी तिला नंदिनीराजे वनवण्याचा त्याचा विचार नसतो.) त्यावेळी त्याची वागणूक अकारण धसमुसळेपणाची वाटते. शिवाय या मुलीला इतके चिखलात बरबटावयाचे कारण काय ! वास्तविक तिला पाण्यातून काढली पण पाण्याचा थेंब तिच्या अंगावर नाही हे कसे ? कलाकारांना काहीसं न पेललेलं हे नाटक, तुलनेने निश्चितपणे सरस होते. आणि तिसऱ्या क्रमांकाचा मान त्याला द्यावाच लागेल.

या तीन नाटकांखेरीज ज्यांच्या परिश्रमांची दखल घेतली जावी असे अन्य चार नाट्यप्रयोग स्पर्धेत पहावयास मिळाले. [ लेखांक दोन पुढील अंकी ]

---

## स्पर्धेचा निकाल

| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ : | अशी पाखरे येती | पी. डी. ए. |
| क्रमांक २ : | निखारे | सरस्वती मंदिर नटसंघ |
| क्रमांक ३ : | हिरा जो भंगला नाही. | भरत नाट्यमंदिर |

---

# अग्निपुत्र

बसन्त पोतदार

प्रसिद्धीकाल : १९७० अखेर

प्रसिद्धीकाल : १९७१ मध्य

रा. म. शास्त्री

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

राजहंस प्रकाशन

# गोपीच्या मर्कटलीला । जॉनीची गुलाबी हेरकथा

सध्या मुंबईच्या बहुतेक साऱ्या थिएटर्सवर लोकांची प्रचंड झिम्मड उडालेली सतत दिसत आहे. देव आनंदचा 'जॉनी' व दिलीपकुमारचा 'गोपी' धमाल माजवून राहिले आहेत. निश्चित माहिती उपलब्ध नसली तरी म्हणतात की ब्लॅकमध्ये साडेतीन रुपयांच्या तिकिटांचे रेट दोन्ही आठवडे २५–३० रुपयांपर्यंत गेले होते ! तरी 'गोपी' पुण्याला आधी प्रदर्शित झाल्याने बऱ्याच दिलीपकुमार-शौकिनांनी हा चित्रपट पुण्याची खास ट्रिप करून पाहून घेतल्याचे सांगतात.

अजूनपर्यंत मुंबईत कोठेही दंगल उसळल्याची किंवा गैरप्रकार झाल्याची (ब्लॅक तिकिटांचे रेट भारी असल्याने त्यांची थिएटरच्या बाहेर लगेच 'दोका तीन' वगैरे पद्धतीने विक्री होत नाही, तर त्याचेही ॲडव्हान्स बुकींग करावे लागते असे सांगतात) माहिती नाही. पण सर्व लहान मोठ्या थिएटर्सबाहेर थोड्याथोड्या अंतरावर पाच पाच दहादहा पोलिसांची टोळकी दिसतात. चित्रपट सुरू झाला की त्यातलेच काही गृहात खिसकतात व भिंतीला लागून अंधारात हारीने उभे राहून चित्रपट पाहतात.

तर असा ह्या दोन चित्रपट क्षेत्रातील नावाचा महिमा. गेली २०–२५ वर्षे तो चित्रपट-प्रतिचित्रपट वाढतच आहे. लोकांना त्यांनी वेडे करून टाकले आहे. प्रत्यक्ष वा पडद्यावर त्यांचे दर्शन व्हावे म्हणून ते तासन्तास खोळंबून बसत आहेत.

आणि त्याबदल्यात त्यांना काय मिळत आहे ? फक्त दर्शनसुख. त्यापलीकडे काही नाही. देव आनंदच्या बाबतीत निदान ते तरी अमाप आहे. पण दिलीपकुमारच्या बाबतीत 'गोपी'मधील त्याच्या मर्कटलीला पाहिल्या की आपल्या जिवंत अभिनयाने 'अंदाज,' 'देवदास,' 'दीदार'सारख्या चित्रपटातील करुणरम्य भूमिका सजीव बनविणाऱ्या दिलीपकुमारची कीव वाटू लागते.

केंद्रीय मंत्री श्री. सत्य नारायण सिन्हा यांनी मद्रास येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय पारितोषिक वितरण समारंभात चित्रपट-माध्यमाची महती आणि सेन्सॉरशिपची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यांनी मद्रासमध्येच जाऊन हे सांगितले हे बरे झाले. तेथेच त्यांनी 'गोपी'चे दिग्दर्शक श्री. भीमसिंग यांचे एक बौद्धिक घेऊन त्यांना चित्रपट-माध्यमात चित्रांचे महत्व काय असते हे समजावून सांगायला

हवे होते. 'गोपी' पाहिला की वाटते आपला सिनेमा अजून ४०-सालातच वावरतो आहे. या चित्रपटातला पहिलाच प्रसंग–ओमप्रकाश, निरुपा रॉय व फरिदा जलाल घराच्या अंगणात असतात. प्रत्येकजण घरातले आपआपले काम करीत असतो व एकीकडे 'गोपी'ला (प्रेक्षकांना) इंट्रोडयूस करण्याच्या दृष्टीने त्यांचे संवाद वळण घेत असतात. ते संवाद जितके भयानक आहेत, तितकाच केविलवाणा त्यांचा आविष्कार. आणि त्यानंतर तीन तास सतत अशा निरर्थक, हेतूशून्य, अप्रयोजक संभाषणांचा सतत भडिमार चालू होता. कधीकधी दक्षिणी नृत्यप्रकारातून राम-रावण वगैरेसारख्या पौराणिक कथा सांगितल्या जातात. कर्कश मोठ्या आवाजातील संवाद व शरीराच्या चहूबाजूंना फक्त हातवारे, असा तो प्रकार वाटतो. 'गोपी'ची कथा ही अशीच सांगितली जाते.

ज्यांनी 'गोपी' पाहिला व सहन केला (माझा राग काढून टाकायला निदान येथे तरी वाव आहे) त्या सर्वांच्या डोक्यातून या चित्रपटाचे कीट निघून जावे म्हणून त्याच्या वतीने मीही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो की यापुढे असले चित्रपट निघायचेच असले तर त्यात दिलीपकुमार वगैरेसारखी नावे येणार नाहीत अशी दक्षता घे. म्हणजे त्या बाजूला आमचे वळणेच व्हायला नको.

याचा अर्थ आम्ही दिलीपकुमारला क्षमा केली असा नाही. पण चित्रपटात इतर आचरटपणा इतका आहे की त्यामध्ये दिलीपकुमारचा रोल खूपच उजवा वाटतो. आजकाल आपण सुशिक्षित प्रेक्षक काही 'रामभक्त हनुमान', 'श्रीकृष्णलीला' वगैरे चित्रपट पहात नाही. तर निदान दिलीपकुमार सादर करीत असल्यामुळे या 'गोपी'लीला तरी पहाणे होते.

'गोपी' असा वैताग देता झाला तरी 'जॉनी'ने मात्र सध्याच्या थंडीत खूपच गुलाबीपणा आणलेला आहे. मनोहारी रंगातील देवआनंद–हेमा मालिनी यांचा सुस्वरूप प्रणय मनाला गुदगुल्या करणारा आहे. बऱ्याच काळाने 'पेईंग गेस्ट' मधल्या खटयाळ देवआनंदचे दर्शन झाल्याने समाधान वाटले. आणि त्याच्या जोडीला स्वप्नील हेमा मालिनी. नूतनची उंची लाभलेल्या या अभिनेत्रीच्या चेहऱ्यात विलक्षण गोडावा आहे यामुळे देव आनंद–हेमामालिनी यांची जोडी छान जमली आहे.

बाकी त्यातील हेरकथशी वगैरे आपल्याला कर्तव्य नाही. पण एस. डी. बर्मन यांची सुरेख गाणी, विजय आनंद यांनी केलेले देखणे टेकिंग आणि दोन मोहक चेहरे... मोठा मजा येऊन जातो चित्रपट पाहताना.

प्रत्येक तरुण–तरुणीने अवश्य पाहिला पाहिजे असा हा चित्रपट.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

लालमहाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

ब. मो. पुरंदरे

किंमत
प्रत्येकी
रुपये तीन

राजहंस प्रकाशन
पुणे.